सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/२२६ दि. २८/०८/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : स्वामी विवेकानंदांच्या शिकागो सर्वधर्म परिषदेतील व्याख्यानाला १३२ वर्ष पूर्ण झाल्या निमित्त उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत...

संदर्भ : १.डॉ. अपर्णा लळिंगकर, मा.अधिसभा सदस्य यांचे दि. २१/०८/२०२५ चे पत्र
२.मा.कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र. व्हीसी/४२७४, जावक दि.२१ ऑगस्ट २०२५ अग्रेषित
३. मा.कुलसचिव यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र जावक क्र.आर/५२६६ दि.२६/०८/२०२५ अग्रेषित

महोदय,

वरिल संदर्भ क्र. १, २ व ३ पत्रानुसार स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो येथील सर्वधर्म परिषदेतील व्याख्यानाला दि. ११ सप्टेंबर रोजी, १३२ वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्त स्वामी विवेकानंद यांच्या कार्यची माहिती विद्यार्थ्यांना होण्याकरिता पुढीलप्रमाणे उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात यावे.

१. व्याख्यानाचे आयोजन करावे. विषय: स्वामी विवेकानंदांची शिकागो सर्वधर्म परिषदेतील भाषणे किंवा स्वामी विवेकानंदांची अमेरिकेतील भाषणे
२. स्वामी विवेकानंदाचे शिकागो येथील इंग्रजी भाषणाचे वाचन आणि त्यावर विचार मंथन करावे.
३. स्वामी विवेकानंदाचे शिकागो येथील मराठी भाषणाचे वाचन आणि त्यावर विचार मंथन करावे.
४. रामकृष्ण मठ प्रकाशित 'शिकागो व्याख्याने–स्वामी विवेकानंद' या ३० पानी पुस्तिकेतील उताऱ्यांचे वाचन आणि त्यावर विचार मंथन करण्यात यावे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांमार्फत वरील उपक्रमांचे आयोजन करावे. आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: वरीलप्रमाणे

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

डॉ. अपर्णा लळिंगकर
सदस्य : अधिसभा (राज्यपाल नियुक्त)
भ्रमणध्वनी : ०९७४२०४५७८५
ई-मेल : aparnalalingkar@gmail.com

Dr. Aparna Lalingkar
Member : Senate (Governor Nominated)
Mob. No. : 09742045785
Mail ID : aparnalalingkar@gmail.com


प्रति,
कुलगुरु, साफुपुवि
गणेशखिंड, पुणे ७

(स्वामी विवेकानंदांच्या शिकागो सर्वधर्म परिषदेतील प्रसिद्ध व्याख्यानाला १३२ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत कार्यक्रम घेण्यासंबंधी)

माननीय महोदय,

स्वामी विवेकानंद हे परतंत्र भारतातील एक असे महापुरुष होते की ज्यांनी अवघ्या तिसाव्या वर्षी शिकागो सर्वधर्म परिषदेमध्ये आपल्या भारतीय संस्कृतीचा आणि हिंदू धर्माचा झेंडा फडकावला. स्वामी विवेकानंद हे भारतीय तरुणांचे प्रेरणास्त्रोत आहेत. खरंतर स्वामी विवेकानंद हा विषय निरंतर अभ्यासण्याचा विषय आहे. परंतु जोपर्यंत त्यांच्या महत्वाच्या कार्याविषयी तरुणांमध्ये थोडीशी माहिती पोहोचत नाही तोपर्यंत त्यांना तसा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळणार नाही.

शिकागो सर्वधर्म परिषदेतील स्वामीजींच्या त्या जगप्रसिद्ध भाषणाला ११ सप्टेंबर रोजी १३२ वर्षे पूर्ण होत आहेत. स्वामी विवेकानंदांचे हे कार्य आपल्या सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा आंतर्गत येणार्या महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्याकडे ही एक अत्यंत उत्तम संधी आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत स्वामी विवेकानंदांचे शिकागो सर्वधर्म परिषदेतील भाषण या अनुषंगाने खालीले पैकी कोणताही एक उपक्रम ११ सप्टेंबरच्या आठवड्यात (८ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२५) या कालावधीत विद्यार्थी विकास परीषदेमार्फत घेण्यात यावा अशी शिफारस मी आपल्याकडे देत आहे.

१) व्याख्यानाचे आयोजन: विषय - स्वामी विवेकानंदांची शिकागो सर्वधर्म परिषदेतील भाषणे किंवा स्वामी विवेकानंदांची अमेरिकेतील भाषणे
२) स्वामी विवेकानंदांचे शिकागो येथील इंग्रजी भाषणाचे वाचन आणि त्यावर विचार मंथन
३) स्वामी विवेकानंदांचे शिकागो येथील भाषणाचा मराठी अनुवाद त्याचे वाचन आणि त्यावर विचार मंथन
४) रामकृष्ण मठ प्रकाशित "शिकागो व्याख्याने - स्वामी विवेकानंद" या ३० पानी पुस्तिकेतील


निवास : १०२, विवानिया अपार्टमेंट्स, वाळवेकर नगर, वाळवेकर उद्यान शेजारी, पर्वती, पुणे-४११००९
**Resi.** : 102, Vivaniya Apts., Walvekar Nagar, Near Walvekar Udyan, Parvati, Pune-411009


Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

डॉ. अपर्णा लळिंगकर
सदस्य : अधिसभा (राज्यपाल नियुक्त)
भ्रमणध्वनी : ०९७४२०४५७८५
ई-मेल : aparnalalingkar@gmail.com

Dr. Aparna Lalingkar
Member : Senate (Governor Nominated)
Mob. No. : 09742045785
Mail ID : aparnalalingkar@gmail.com

उतार्यांचे वाचन आणि त्यावर विचार मंथन

मी सोबत त्यांच्या मूळ इंग्रजी भाषणाचा मजकूर आणि त्याचे मराठी भाषांतर जोडत आहे. याचबरोबर रामकृष्ण मठ प्रकाशित "शिकागो व्याख्याने - स्वामी विवेकानंद" या पुस्तिकेची स्कॅन्ड कॉपी जोडत आहे. कार्यक्रमाच्या सूचने बरोबरच त्याच्या प्रति महाविद्यालयांमध्ये पाठवाव्यात ही विनंती.

आपली विश्वासू,

A Lalingkar 29/08/2024

डॉ. अपर्णा लळिंगकर
राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य, साफुपुवि

मा. कुलगुरू यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
पत्र प्राप्त झाले
दिनांक: 21/8/25
स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
25 AUG 2025
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 2193
जावक दिनांक: 26-8-25

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक
दिनांक 23 AUG 2025
आवक क्रमांक व्हीसी 4327
जावक दिनांक 23 AUG 2025

| | |
|---|---|
| Subject | ११ सप्टेंबर निमित्त कार्यक्रम पत्र आणि मटेरियल. |
| From | Aparna Lalingkar <aparnalalingkar@gmail.com> |
| To | Wasudeo Gade <puvc@unipune.ac.in> |
| Date | 22-08-2025 04:06 PM |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७
आवक/जावक क्र.: 435
दिनांक 28 AUG 2025
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-

- Letter given to VC.pdf (~977 KB)

प्रति,
कुलगुरु, साफुपुवि
गणेशखिंड, पुणे ७
(स्वामी विवेकानंदांच्या शिकागो सर्वधर्म परिषदेतील प्रसिद्ध व्याख्यानाला १३२ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत कार्यक्रम घेण्या संबंधी)
माननीय महोदय,
स्वामी विवेकानंद हे परतंत्र भारतातील एक असे महापुरुष होते की ज्यांनी अवघ्या तिसाव्या वर्षी शिकागो सर्वधर्म परिषदेमध्ये आपल्या भारतीय संस्कृतीचा आणि हिंदू धर्माचा झेंडा फडकावला. स्वामी विवेकानंद हे भारतीय तरुणांचे प्रेरणास्त्रोत आहेत. खरंतर स्वामी विवेकानंद हा विषय निरंतर अभ्यासण्याचा विषय आहे. परंतु जोपर्यंत त्यांच्या महत्वाच्या कार्याविषयी तरुणांमध्ये थोडीशी माहिती पोहोचत नाही तोपर्यंत त्यांना तसा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळणार नाही. शिकागो सर्वधर्म परिषदेतील स्वामीजींच्या त्या जगप्रसिद्ध भाषणाला ११ सप्टेंबर रोजी १३२ वर्षे पूर्ण होत आहेत. स्वामी विवेकानंदांचे हे कार्य आपल्या सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आणि विद्यापीठा आंतर्गत येणार्या महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्याकडे ही एक अत्यंत उत्तम संधी आहे. विद्यापीठात आणि विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत स्वामी विवेकानंदांचे शिकागो सर्वधर्म परिषदेतील भाषण या अनुषंगाने खालीले पैकी कोणताही एक उपक्रम ११ सप्टेंबरच्या आठवड्यात (८ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२५) या कालावधीत विद्यार्थी विकास परीषदेमार्फत घेण्यात यावा अशी शिफारस मी आपल्याकडे देत आहे.

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आ/ 5266
दिनांक: 26.08.2025
जावक दिनांक 26.08.2025
विभाग:

Dir-BSD/NSS

१) व्याख्यानाचे आयोजन: विषय - स्वामी विवेकानंदांची शिकागो सर्वधर्म परिषदेतील भाषणे किंवा स्वामी विवेकानंदांची अमेरिकेतील भाषणे
२) स्वामी विवेकानंदांचे शिकागो येथील इंग्रजी भाषणाचे वाचन आणि त्यावर विचार मंथन
३) स्वामी विवेकानंदांचे शिकागो येथील भाषणाचा मराठी अनुवाद त्याचे वाचन आणि त्यावर विचार मंथन
४) रामकृष्ण मठ प्रकाशित "शिकागो व्याख्याने - स्वामी विवेकानंद" या ३० पानी पुस्तिकेतील उतार्यांचे वाचन आणि त्यावर विचार मंथन
मी सोबत त्यांच्या मूळ इंग्रजी भाषणाचा मजकूर आणि त्याचे मराठी भाषांतर जोडत आहे. याचबरोबर रामकृष्ण मठ प्रकाशित "शिकागो व्याख्याने - स्वामी विवेकानंद" या पुस्तिकेची स्कॅन्ड कॉपी जोडत आहे. कार्यक्रमाच्या सूचने बरोबरच त्याच्या

प्रति महाविद्यालयांमध्ये पाठवाव्यात ही विनंती.
आपली विश्वासू,

डॉ. अपर्णा लळिंगकर
राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य, साफुपुवि

((सोबत या पत्राची कुलगुरु कार्यालयात सादर प्रतीची स्कॅन्ड प्रत जोडलेली आहे.)
IMG_0002.pdf
<https://drive.google.com/file/d/1oTw9HBF2bjU6_V48SvcZbC06U87_tUhp/view?usp=drive_web>
Speech delivered by Swami Vivekananda on September 11.docx
<https://drive.google.com/file/d/1FKvLj7Uf07_FwSQ94HqiiQsW4B7bBil2/view?usp=drive_web>
Swami Vivekananda's speeches in Chicago.pdf
<https://drive.google.com/file/d/1HwTIBwbnQtpapWgK9JibevJU5M4A8pw-/view?usp=drive_web>

Speech delivered by Swami Vivekananda on September 11, 1893, at the first World's Parliament of Religions on the site of the present-day Art Institute

Sisters and Brothers of America,

It fills my heart with joy unspeakable to rise in response to the warm and cordial welcome which you have given us. I thank you in the name of the most ancient order of monks in the world, I thank you in the name of the mother of religions, and I thank you in the name of millions and millions of Hindu people of all classes and sects.

My thanks, also, to some of the speakers on this platform who, referring to the delegates from the Orient, have told you that these men from far-off nations may well claim the honor of bearing to different lands the idea of toleration. I am proud to belong to a religion which has taught the world both tolerance and universal acceptance. We believe not only in universal toleration, but we accept all religions as true. I am proud to belong to a nation which has sheltered the persecuted and the refugees of all religions and all nations of the earth. I am proud to tell you that we have gathered in our bosom the purest remnant of the Israelites, who came to Southern India and took refuge with us in the very year in which their holy temple was shattered to pieces by Roman tyranny. I am proud to belong to the religion which has sheltered and is still fostering the remnant of the grand Zoroastrian nation. I will quote to you, brethren, a few lines from a hymn which I remember to have repeated from my earliest boyhood, which is every day repeated by millions of human beings: "As the different streams having their sources in different paths which men take through different tendencies, various though they appear, crooked or straight, all lead to Thee."

The present convention, which is one of the most august assemblies ever held, is in itself a vindication, a declaration to the world of the wonderful doctrine preached in the Gita: "Whosoever comes to Me, through whatsoever form, I reach him; all men are struggling through paths which in the end lead to me." Sectarianism, bigotry, and its horrible descendant, fanaticism, have long possessed this beautiful earth. They have filled the earth with violence, drenched it often and often with human blood, destroyed civilization and sent whole nations to despair. Had it not been for these horrible demons, human society would be far more advanced than it is now. But their time is come; and I fervently hope that the bell that tolled this morning in honor of this convention may be the death-knell of all fanaticism, of all persecutions with the sword or with the pen, and of all uncharitable feelings between persons wending their way to the same goal.

# शिकागो व्याख्याने

(शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेसमोर दिलेली व्याख्याने)

स्वामी विवेकानंद

अनुवादक

स्वामी शिवतत्त्वानंद

रामकृष्ण मठ

नागपूर

## भगिनी निवेदिता यांची

# प्रस्तावना

इ. स. १८९३ साली, अमेरिकेतील शिकागोशहरी भरलेल्या जागतिक प्रदर्शनाच्या अनुषंगाने एक धर्मसभाही भरविण्यात आली होती. तीच सुप्रसिद्ध 'शिकागो सर्वधर्मपरिषद' होय. आजकाल पाश्चात्त्य देशांत आंतरराष्ट्रीय प्रदर्शने भरविण्याची प्रथाच पडून गेली आहे, आणि त्यांच्याच अनुषंगाने भौतिक विज्ञान, कला, साहित्य वगैरेंच्या परिषदाही भरविण्याचा प्रघात पडला आहे. असे करण्यात, ज्या ज्या विषयांच्या प्रगतीविषयी मानवजातीला आस्था वाटते त्या त्या विषयांच्या इतिहासात असले प्रसंग चिरस्मरणीय व्हावेत अशी संचालकांची अपेक्षा असते. वैद्यक, कायदा, स्थापत्य प्रभृ ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांतील तात्त्विक व व्यवहार्य संशोधनाविषयी विचारविनिमयाला, असल्या आंतराष्ट्रीय प्रदर्शनानिमित्त एकत्र संमीलित होणाऱ्या विशाल जनसमुदायाने उत्तेजन द्यावयास हवे असे मानण्यात येत असते. परंतु, जगातील सर्व प्रमुख धर्मांची परिषद भरल्यानेच ह्या सर्व परिषदांवर कळस चढेल ही कल्पना केवळ शिकागोच्या नागरिकांनाच सुचू शकली, आणि हे अमेरिकेच्या स्वभावसिद्ध धाडसाला व जन्मसिद्ध कल्पकतेला साजेल असेच झाले! तदनुसार, प्रत्येक धर्माच्या प्रतिनिधीला स्वमतप्रतिपादनाची, स्वतःच्या धर्ममताच्या समर्थनाची संधी देऊन सर्वांचे म्हणणे गंभीरपणे व सहानुभूतिपूर्वक ऐकून घेण्याचे त्या उदारधींनी ठरविले. अशा रीतीने समतेच्या आणि स्वमतप्रतिपादनस्वातंत्र्याच्या वातावरणात भरणाऱ्या या संमेलनानेच, जागतिक सर्वधर्मपरिषद भरविण्याचा आपला हेतू तडीस जाईल अशी त्या लोकांची धारणा होती. या सर्व प्रयत्नांतून एक गोष्ट अचूकपणे निष्पन्न होणार होती, ती ही की या प्रसंगी, 'भिन्न भिन्न धर्मांमध्ये बंधुभाव प्रस्थापित व्हावयास लागणारी भूमिका' समस्त जगासमोर उद्घोषित होणार होती.



प्रतिनिधी पाठविण्याबाबत प्रचलित असलेल्या औपचारिक शिष्टाचारासंबंधी संपूर्ण अननुभवी अशा काही दाक्षिणात्य शिष्यांनी, प्रस्तुत सर्वधर्मपरिषदेत उपस्थित राहून हिंदुधर्माच्या वतीने भाषण देण्याची आवश्यकता स्वामी विवेकानंदांच्या मनावर साग्रह बिंबवून दिली. आपल्या गुरुदेवांवरील अपरंपार श्रद्धेमुळे त्या बिचाऱ्यांच्या हे ध्यानीही आले नाही की त्यांची ही आकांक्षा परिपूर्ण होणे अगदी अशक्य कोटीतील होते! विवेकानंदांनी जाऊन उपस्थित होण्याचाच काय तो अवकाश, त्यांना संधी ही मिळालीच पाहिजे हा त्यांचा अभिप्राय! जागतिक व्यवहारात स्वामीजीही आपल्या शिष्यवृंदांप्रमाणेच साधे व सरळ होते. आणि म्हणून, हा प्रयत्न करण्याचा आपल्याला दैवी आदेश आहे अशी खात्री होताच मग स्वामीजींनी त्या बाबतीत काहीच आढेवेढे घेतले नाहीत. जगातील अत्यंत संपन्न व सामर्थ्यशाली राष्ट्राच्या सुसंरक्षित द्वारी प्रवेशार्थ जाताना हिंदुधर्माच्या प्रतिनिधीने असे अज्ञातपणे आणि परिचयपत्राशिवाय जावे, याहून खुद्द हिंदुधर्माच्या असंघटितपणाचे दुसरे उत्कृष्ट उदाहरण, मला वाटते, शोधूनही सापडणार नाही. परंतु, एकदा शिकागो महानगरीत पाय ठेवल्यानंतर मात्र खरी वस्तुस्थिती ध्यानात येण्यास स्वामीजींना फार वेळ लागला नाही. ज्यांना निमंत्रण पाठविण्यात आले आहे व ज्यांनी त्याचा स्वीकार केला आहे अशा कोणत्याच मान्य संस्थेच्या वतीने ते त्या ठिकाणी गेलेले नव्हते. शिवाय प्रतिनिधींच्या संख्येत भर टाकण्याची वेळ केव्हाच निघून गेली होती. अशा परिस्थितीत, हिंदुस्थानात परत फिरण्यापूर्वी बोस्टनशहरी कुणाकडून तरी अकस्मात परिचयपत्र मिळविण्याच्या अंधुक आशेने शिकागोच्या बंद द्वारांपासून स्वामीजी बोस्टनकडे किती निराश हृदयाने वळले असतील बरे!

भविष्यकालाच्या रहस्यमय गर्भात काय दडलेले होते याविषयी पूर्ण अज्ञान, आणि स्वतःच्या कसल्याही योजनेचा संपूर्ण अभाव अशा परिस्थितीत स्वामीजींची अगदी अकल्पितपणे हार्वर्ड विश्वविद्यालयाच्या प्रोफेसर राइट नामक व्यक्तीशी गाठ पडली. स्वामीजींच्या लोकोत्तर प्रतिभेची ओळख पटण्यास सदरहू प्रोफेसरांना फारसा विलंब लागला नाही. स्वामीजींच्या मद्रासी शिष्यांप्रमाणे त्यांचेही मत पडले की, आगामी धर्ममहासभाप्रसंगी जगाने ह्या

थोर विभूतीचे म्हणणे ऐकून घेतलेच पाहिजे. पुढे एकदा प्रोफेसरसाहेबांनी स्वामीजीना लिहिले होते, "आपणास परिचयपत्र मागणे म्हणजे सूर्यास 'तुला प्रकाशण्याचा काय अधिकार आहे' असे विचारण्यासारखेच होय!" राइट साहेबांच्या असल्या प्रेमाने आणि वजनाने विवेकानंदांचा मार्ग मोकळा होऊन ते शिकागोला परत आले. आता स्वामीजींना सर्वधर्मपरिषदेच्या प्रतिनिधीचा मान आणि स्थान अनायासेच प्राप्त झाले. आणि सर्वधर्मपरिषदेच्या अधिवेशनाला प्रत्यक्ष आरंभ झाला त्या वेळी ते व्यासपीठावर प्रतिनिधी म्हणून विराजमान झालेले दिसले. तिथे ते एकटेच भारतीय, नव्हे, एकमेव वंगवासीही नसले तरी खास हिंदुधर्माचे ते एकच एक प्रतिनिधी होते यात मात्र संशय नाही. इतर सर्वजण या ना त्या संस्थेचे, संप्रदायाचे वा मताचे पुरस्कर्ते म्हणून आले होते. स्वामीजी, आणि एकमेव स्वामीजीच आज अखिल हिंदूंच्या धार्मिक कल्पनांचा पुरस्कार करणार होते. त्यांच्या प्रभावी पुरस्कारांमुळे त्या धार्मिक कल्पनांना आज प्रथमच एकसूत्रता, स्पष्टता आणि सुसंगत स्वरूप प्राप्त होणार होते. दक्षिणेश्वरी आपल्या गुरुदेवांच्या जीवनात आणि नंतर परिव्राजक अवस्थेतील आसेतुहिमाचल भ्रमणात त्यांना ज्या भारतीय धर्माचे दर्शन घडले, त्याचाच उच्चार या समयी त्याच्या मुखातून झाला. ज्या धर्ममताविषयी समस्त भारतात संपूर्ण एकमत आहे, दुही वा मतभेद मुळीच नाही, त्याचाच त्यांनी तिथे सदैव उल्लेख केला. सर्वधर्मपरिषदेच्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात सतरा दिवस प्रबंधवाचन चालले होते. स्वामी विवेकानंदांनी हिंदुधर्मावरील आपला प्रबंध एकोणीस तारखेस वाचला. पण वास्तविक पाहता, प्रतिनिधींच्या स्वागतार्थ झालेली औपचारिक भाषणे आणि त्यांना त्या प्रतिनिधींनी दिलेली उत्तरे ज्या दिवशी श्रोतृवृंदाने श्रवण केली, त्या प्रथम दिवसापासूनच स्वामीजी व श्रोतृवर्ग यांच्यामधे एक जिव्हाळ्याचा संबंध स्थापित होऊन चुकला होता. तिसऱ्या प्रहरी बऱ्याच उशीरा स्वामीजींनी स्वागतास उत्तरादाखल भाषण केले. त्या प्रसंगी त्यांनी शुद्ध भारतीय प्रथेला अनुसरून श्रोत्यांना 'अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूनो' या साध्याच पण गोड शब्दांनी संबोधिले. पौर्वात्य संन्यासी असून देखील त्यांनी नारीजातीला अग्रपूजेचा मान देऊन, अखिल वसुधेलाच स्वतःचे कुटुंब म्हणून संबोधताच समस्त श्रोतृसमुदायाच्या हृदयात



जी एक अननुभूत लहर उठून गेली तिचे वर्णन त्या प्रसंगी तिथे उपस्थित असलेल्या अनेक व्यक्तींनी कितीदा तरी मजजवळ केले आहे. "आमच्यापैकी एकाला देखील तसे कधी सुचलेच नाही!" — असे ते सांगत. स्वामीजींच्या भावी यशस्वितेची जवळजवळ त्याच क्षणी झाली म्हटल्यास शोभेल. पुढे पुढे तर उतावीळ आणि गडबड करणाऱ्या श्रोतृसमाजाला शांत करण्यासाठी, 'आपण शांत चित्ताने बसाल तर शेवटी स्वामीजी आपणास एक गोष्ट सांगतील वा भाषण करतील' म्हणून लालूच दाखविणे परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या आंगवळणीच पडून गेले होते! असल्या लहानलहान भाषणांपैकी काही सुरक्षित ठेवली गेली असून प्रस्तुत पुस्तकात त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

हिंदुधर्माच्या इतिहासात प्रस्तुत सर्वधर्मपरिषद ही एक युगप्रवर्तक घटना होय. जसजसा काळ जाईल तसतसे तिचे महत्त्व अधिकाधिक विशद होईल. केवळ बाह्य देखाव्याच्या आणि भव्यतेच्या दृष्टीने देखील प्रतिनिधींचे हे संमलेन आवाहनापासून विसर्जनापर्यंत असे विलक्षण प्रेक्षणीय झाले असले पाहिजे की तसले अभूतपूर्व दृश्य आपल्या आयुष्यात आपल्यापैकी कुणालाच बघावयास मिळण्याची आशा नाही. कोट्यवधी लोकांच्या धर्ममतांचे प्रतिनिधी व्यासपीठावर संमीलित झाले आहेत — हे दृश्य कल्पनापटलावर चित्रित करण्यासाठी खालील वर्णन बरेच उपयोगी पडेलसे वाटते. परिषदेच्या कार्यावलीच्या आपल्या अधिकृत इतिहासात रे. जॉन हेन्री बॅरोज लिहितात :—

"ठराविक वेळेच्या बऱ्याच आधीपासून सभागृह प्रतिनिधींनी व प्रेक्षकांनी नुसते फुलून गेले होते. तो सुविशाल 'कोलंबसचा दिवाणखाना' देशविदेशांहून आलेल्या चार हजार उत्सुक श्रोत्यांनी चिकार भरून गेला होता. दहा वाजता, बाजूच्या पडवीतून, नाना राष्ट्रांच्या फडफडणाऱ्या ध्वजांखालून एकमेकांच्या हातात हात घालून जगातील सुमारे बारा धर्ममतांच्या प्रतिनिधींनी सभागृहात प्रवेश करिताच समागत विशाल श्रोतृसमुदायाने अत्यंत उत्साहाने त्यांचे स्वागत केले. त्या क्षणी ते व्यासपीठ अत्यंत रमणीय व भव्य दिसत होते. संयुक्तसंस्थानातील आपल्या संप्रदायाचे सर्वश्रेष्ठ धर्मगुरू कार्डिनल गिबन्स हे तांबडी वस्त्रे परिधान करून व्यासपीठाच्या मध्यभागी एका प्रशस्त उच्चासनावर

विराजमान झाले होते. आज ते प्रथम प्रार्थना करून सर्वधर्मपरिषदेच्या कार्यास प्रारंभ करणार होते, आणि त्या कौलंबसाच्या वर्षाला अनुरूप असाच हा कार्यक्रम होता.

"कार्डिनलसाहेबांच्या दोन्ही बाजूंना, त्यांच्या भपकेदार पोषाखाशी जणू स्पर्धाच करणारे नाना रंगांचे वेष परिधान केलेले पौर्वात्य प्रतिनिधी आपापल्या जागी उपविष्ट झाले होते. ब्राह्म, बुद्ध व महंमद यांच्या अनुयायिवर्गामधे भारतातील श्रेष्ठ वक्ते स्वामी विवेकानंद प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीस येत होते. त्यांचा वेष लाल रंगाचा होता आणि त्यांनी डोक्यास बांधलेल्या केशरी फेट्यामुळे त्यांचे आरक्त मुखमंडल शोभायमान दिसत होते. त्यांच्याच बाजूला श्वेत व नारिंगी वेषात ब्राह्मसमाजाचे श्री. नगरकर आणि सिलोनचे सुप्रसिद्ध विद्वान बौद्ध धर्मपाल बसलेले होते. धर्मपालांच्या सडपातळ देहावर पांढरा शुभ्र पोषाख होता आणि त्यांचे काळेभोर कुरळे केस खांद्यावर रुळत होते. आपल्या साडेसत्तेचाळीस कोटी धर्मबांधवांचा शुभसंदेश घेऊन ते आज धर्म-महासभाप्रसंगी उपस्थित झाले होते.

"तिथे मुसलमान, पारशी आणि जैन धर्मगुरूही आले होते. त्यांच्यातील प्रत्येकाचा पोषाख व हालचाली अत्यंत प्रेक्षणीय होत्या, आणि सर्वजण आपापल्या धर्ममताचे स्पष्टीकरण व समर्थन करावयास उत्सुक झाले होते.

"परंतु, ह्या अखिल समाजामध्ये सर्वांत डोळ्यांत भरण्यासारखा कोणता समूह असेल तर तो चिनी व जपानी प्रतिनिधींचा. हे सर्व स्वतःच्या देशांत मान्यता पावलेले प्रतिष्ठित धर्मगुरू होते. त्यांचे कपडे उंची रेशमाचे असून इंद्रधनुष्यासारखे चित्रविचित्र रंगांचे होते. बौद्ध, टाओ, कन्फ्यूशियन आणि शिंतो धर्ममतांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून ते परिषदेस आलेले होते.

"जवळजवळ विरक्त पुरुषाला शोभण्याजोगा कृष्णवर्ण वेष घातलेले श्री. प्रतापचंद्र मजुमदारही आपल्या पौर्वात्य बांधवांमधे बसलेले होते. श्री. प्रतापचंद्र हे भारतातील ब्राहमसमाजाचे अध्वर्यू असून ह्या देशात आणखीही एकदा आले होते. आपल्या वक्तृत्वाने व आंग्लभाषेवरील प्रभुत्वाने त्यांनी विशाल श्रोतृसमुदायांना अनेकदा आनंदित केले होते.

"दुसरी आकर्षक व्यक्ती म्हटली म्हणजे झांटेचे ग्रीक आर्चबिशप हे




होत. त्यांची ती लांब व भव्य दाढी त्यांच्या वक्षःस्थलावर रुळत होती. त्यांच्या डोक्यावर एक विचित्र आकाराची टोपी असून, एका चमत्कारिक रीतीने कोरलेल्या काठीवर आपला भार टाकून ते बसले होते, आणि त्यांच्या कमरपट्ट्याला एक भला मोठा रुपेरी क्रूस लटकत असलेला दिसत होता. एक लालबुंद गालांचा जटाधारी ग्रीक संन्यासी आशियामायनरमधून आला होता, तोही त्यांच्या शेजारीच बसला होता. तो मोठ्या अभिमानाने सांगे की, आपण आजपावेतो डोक्यात कधीच काही घातले नसून अन्नासाठी व निवाऱ्याच्या जागेसाठी कधी एक पै सुद्धा खर्च केली नाही.

"आफ्रिकन मेथॉडिस्ट चर्चचे धर्मगुरू बिशप अर्नेट व एक आफ्रिकन राजपुत्र या दोघांचे कृष्णवर्ण पण तेजस्वी चेहरे, त्यांच्याच समवेत आलेल्या स्त्रियांच्या सुंदर पोशाखांमुळे अधिकच उठावदार दिसत होते. आणि या साऱ्यांची गंभीर पार्श्वभूमी समागत प्रॉटेस्टंट प्रतिनिधींच्या व निमंत्रित पाहुण्यांच्या कृष्णवर्ण वस्त्रांची बनलेली होती." (ओकलंड, कॅलिफोर्निया येथील रे. वेंडेट साहेबांच्या व्याख्यानांतून उद्धृत.)

आपल्या भाषणाच्या समारोपात, स्वतःसमोर भरलेल्या त्या सर्वधर्मपरिषदेची, सम्राट अशोकाच्या धर्मसभेशी अथवा अकबर बादशहाच्या धर्मसंमेलनाशी तुलना करून; स्वामी विवेकानंदांनी तिच्या ऐतिहासिक महत्त्वाविषयी आपले मत प्रदर्शित केले ते योग्यच झाले. असली विशाल व महत्त्वाकांक्षी योजना आखण्याचे धाष्ट्यं त्या नवनिर्मित राष्ट्राच्या दुर्दम्य यौवनालाच शोभण्यासारखे होते, आणि तिला यशस्वी रीतीने तडीस नेणेही तेथील नागरिकांच्या तसल्याच दुर्दम्य कार्यशक्तीला व उत्साहाला शोभेल असेच होते. अद्‌भुत ती योजना आणि विलक्षण तिचे मूर्त स्वरूप ! भिन्नभिन्न धर्मांची ही महापरिषद स्वरूपतःच अशी होती की तिथे हिंदुधर्माच्या सर्वसमन्वयात्मक उदार भावांच्या उद्घोषणेस संपूर्ण वाव मिळावा. जगातील अत्यंत उद्धत, अनुदार आणि पराकाष्ठेची असहिष्णू धर्ममते, तिथे समता, परस्पर आदर व सौजन्य ह्या लोकशाहीच्या साधारण तत्त्वांनी प्रेरित होऊन एकत्र संमीलित झाली होती. एवढ्या प्रमाणावर असले अग्निदिव्य करावयास ती परत कधी सिद्ध होतीलसे वाटत नाही. आणि म्हणून, शिकागो धर्मसंमेलन बहुधा सुदीर्घ

कालपर्यंत इतिहासात एक अद्वितीय घटनाच होऊन राहण्याचा फार संभव आहे. ते कसेही असले तरी हिंदुधर्माने पाश्चिमात्य जगाला सर्वप्रथम स्वतःचा परिचय करून दिला त्या समयी ही अशी परिस्थिती होती आणि हे असे दृश्य होते.

**भगिनी निवेदिता**
(मिस् मार्गारेट नोबल)





# शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेसमोर दिलेली व्याख्याने

**प्रथम दिवसाचे अधिवेशन. ११ सप्टेंबर १८९३.**

धर्ममहासभेचे अध्यक्ष कार्डिनल गिबन्स यांच्या दोन्ही बाजूंना, पूर्वेकडील नाना धर्मांचे प्रतिनिधी आपापल्या आसनांवर बसले होते. त्यांचे निरनिराळ्या रंगांचे वेष उज्ज्वलतेत जणू कार्डिनल साहेबांच्या पोषाखाशी स्पर्धाच करीत होते. हिंदू, बौद्ध आणि मुसलमान प्रतिनिधींच्या त्या समुदायात भारतातील श्रेष्ठ वक्ते श्रीमत स्वामी विवेकानंद आपल्या भगव्या वेषात सर्वांपेक्षा अधिक आकर्षक दिसत होते. डोक्यास बांधलेल्या केशरी फेट्यामुळे त्यांचे ते आरक्त मुखमंडल फारच शोभिवंत दिसत होते.

इतर काही प्रतिनिधींची भाषणे समाप्त झाल्यानंतर स्वामी विवेकानंदांना श्रोतृमंडळीसमोर बोलवण्यात येऊन त्यांचा परिचय करून देण्यात आला. आणि मग आपल्या गुरुदेवांना मनाने वंदन करून स्वामी विवेकानंदांनी श्रोतृवृंदाला 'अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो' म्हणून संबोधिताच, टाळ्यांच्या कडकडाटाने आणि प्रशंसासूचक उच्च स्वरांनी ते विशाल सभागृह कित्येक क्षण सारखे दुमदुमत होते ! सभागृहात स्तब्धता प्रस्थापित झाल्यानंतर, प्रतिनिधींना देण्यात आलेल्या स्वागत-सन्मानास उत्तरादाखल स्वामीजींनी खालील लहानसे भाषण केले –

# स्वागतास उत्तर

अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो,

आज तुम्ही जे आमचे हृदयापासून आणि अगत्याने स्वागत केलेत त्यास उत्तर देण्यासाठी मी येथे उभा आहे. शब्द सुचत नाहीत, हृदय अवर्णनीय आनंदाने भरून येत आहे. जगातील सर्वात प्राचीन अशा संन्यासीसमाजातर्फे मी तुम्हाला धन्यवाद देत आहे. नाना धर्मांचे उगमस्थान जो सनातन हिंदुधर्म, त्याचा प्रतिनिधी या नात्याने मी तुम्हास धन्यवाद देत आहे. आणि, अधिक काय बोलू, अवघ्या पृथ्वीच्या पाठीवरील सर्व वर्णांच्या व सर्व संप्रदायांच्या कोटी कोटी हिंदू नरनारींच्या वतीने मी आज तुम्हाला धन्यवाद देत आहे.

याच व्यासपीठावरून पूर्वेकडील प्रतिनिधींविषयी बोलताना काही सन्मान्य वक्त्यांनी असे मत प्रकट केले आहे की, "दूरदूरच्या देशांतून आलेले हे प्रतिनिधी, सर्वत्र सहिष्णुतेचा भाव पसरविणारे म्हणून गौरवास पात्र होत यात काहीच संशय नाही." या वक्त्यांचेही मी आभार मानतो. जो धर्म समस्त जगताला 'सहिष्णुता' आणि 'सर्वच मतांना मानणे' या दोहोंचीही शिकवण निरंतर देत आला आहे, त्या धर्मात जन्मास आल्याबद्दल मला गौरव वाटतो. अन्यधर्मीयांविषयी आम्ही केवळ सहिष्णुताच बाळगतो असे नव्हे, तर सर्वच धर्म सत्य आहेत असा आमचा दृढ विश्वास आहे. परकीयांच्या छळामुळे देशोधडीस लागलेल्या कोणत्याही जातीच्या आणि कोणत्याही धर्माच्या निराश्रितांना ज्या जातीने सर्वदा आश्रय दिला आहे, त्या जातीत जन्मास आल्याबद्दल मला अभिमान वाटतो. ज्या वर्षी रोमनांच्या निष्ठुर अत्याचारांनी यहुदी लोकांचे पवित्र देवालय भग्न होऊन मातीस मिळाले, त्याच वर्षी काही जातिवंत यहुदी आश्रयार्थ दक्षिण भारतात आले असता माझ्याच जातीने त्यांना सादर हृदयाशी धरिले, हे सांगताना मला भूषण वाटत आहे. वैभवशाली पारशी जातीच्या उरलेल्या लोकांना ज्या धर्माने आसरा दिला आणि आजही जो धर्म त्यांचे प्रतिपालन करीत आहे, त्याच धर्मात मी जन्मास आलो आहे. बंधूंनो, लक्षावधी हिंदू नरनारी ज्या स्तोत्राचा प्रतिदिन पाठ करतात, आणि जे मी अगदी



लहानपणापासून म्हणत आलो आहे, त्याच स्तोत्रातील काही ओळी मी आज तुमच्यासमोर उद्धृत करितो –

"रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिलनानापथजुषाम्
नृणाम् एको गम्यः त्वमसि पयसाम् अर्णव इव।"

"भिन्न भिन्न उगमांतून निघणारे विभिन्न जलप्रवाह ज्याप्रमाणे अंती सागरास मिळून एक होऊन जातात, त्याचप्रमाणे रुचिवैचित्र्यानुसार वेगवेगळ्या सरळ वा वक्र मार्गांनी जाणारे सर्व पथिक, प्रभो, अंती तुलाच येऊन मिळतात."

गीतेत भगवान श्रीकृष्ण उद्घोषित करितात –

"ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम्
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।"

"कुणी कोणत्याही भावाचा आश्रय घेऊन मजप्रत येईना का, मी त्याच भावाने त्यावर अनुग्रह करीत असतो. अर्जुना, लोक चोखाळीत असलेले निरनिराळे मार्ग अखेरीस मलाच येऊन मिळतात". आजची ही अपूर्व, महिमाशाली सर्वधर्मपरिषद वरील उदात्त सत्य अवघ्या जगासमोर जाहीरपणे प्रस्थापित करीत आहे.

पंथाभिमान, स्वमतान्धता आणि तज्जन्य अनर्थकारी धर्मवेड यांनी या आपल्या सुंदर वसुंधरेवर दीर्घकाल अंमल गाजविला आहे. त्यांनी जगामध्ये अनन्वित अत्याचार माजविले असून कितीदा तरी ही पृथ्वी नररक्ताने न्हाणून काढली आहे. संस्कृतींचा विध्वंस करून त्यांनी कधीकधी राष्ट्रेची राष्ट्रे हताश करून सोडली आहेत. हे भयंकर राक्षस नसते तर मानवसमाज आज आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक उन्नत होऊन गेला असता. पण आता त्यांचीही घटका भरली आहे आणि मला अशी उत्कट आशा वाटते की, या धर्मपरिषदेच्या सन्मानार्थ आज प्रातःकाळी निनादित झालेला घंटानाद समूळ धर्मवेडाची, धर्माच्या नावाखाली शस्त्राने वा लेखणीने केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या छळाची, आणि एकाच लक्ष्याकडे आपापल्या मार्गांनी जात असलेल्या व्यक्तींतील एकमेकांविषयीच्या असहिष्णुतेच्या समस्त भावनांची मृत्युघंटाच ठरेल.

□ □ □

# धर्माधर्मांतील कलहांचे मूळ

**पांचव्या दिवसाचे अधिवेशन**

**१५ सप्टेंबर १८९३.**

(शुक्रवार, तारीख १५ सप्टेंबर रोजी तिसऱ्या प्रहरी, परिषदेच्या पाचव्या दिवसाच्या अधिवेशनसमयी, भिन्न भिन्न धर्मावलंबी प्रतिनिधींनी आपापल्या धर्माचे श्रेष्ठत्व प्रतिपादण्यासाठी वितंडवादास सुरुवात केली. अखेरीस स्वामी विवेकानंदांनी पुढील गोष्ट सांगून सर्वांची तोंडे बंद करून टाकली.)

मी तुम्हाला एक गोष्ट सांगणार आहे. 'इतःपर आपण एकमेकांची निंदा करणे थांबवू या' असे आत्ताच बोलून गेलेल्या वक्त्यांनी म्हटलेले तुम्ही ऐकलेच आहे. आणि, आपण एकमेकांशी असे नेहमी झगडत असावे याबद्दल त्यांनी खूप खेदही पण प्रदर्शित केला आहे. परंतु मला वाटते की, मी जी गोष्ट तुम्हाला सांगण्याचे योजले आहे, ती या आपसातील कलहांच्या कारणावर खचित प्रकाश पाडील. ती गोष्ट अशी –

एका विहिरीत एक बेडूक राहत असे. तो तिथे पुष्कळ दिवसांपासून होता. त्या विहिरीतच तो जन्मला आणि तिथेच वाढतही होता. पण अजूनही तो एक लहानसा बेडूकच होता. अर्थातच, त्या काळी आजकालचा एकही क्रमविकासवादी हजर नसल्याकारणाने, त्या अंधाऱ्या कुपात चिरकाल वास केल्याने त्या बेडकाची दृष्टी गेली होती की नाही हे सांगणारा आपल्याला कुणीही मिळणार नाही. तथापि आपल्या गोष्टीच्या सोयीकरिता आपल्याला असे गृहीत धरूनच चालावे लागेल की त्याची दृष्टी अगदी शाबूत होती. तो दररोज असल्या विलक्षण उत्साहाने त्या विहिरीतील जंतुजिवाणूंचा फन्ना उडवून तिथले पाणी स्वच्छ ठेवीत असे की ते बघून आमच्या आजच्या जंतुशास्त्रज्ञांनीही खालीच मान घालावी! त्याचा हा क्रम अखंड चालू होता आणि लवकरच तो छान गुटगुटीत पण होऊन गेला. असो, होता होता काय झाले की एक समुद्राकाठी राहणारा बेडूक त्या विहिरीत येऊन पडला.

"कुठला रे तू राहणारा?" कूपमंडुकाने पृच्छा केली.

"समुद्रात राहत असतो मी, तिथून आलोय्" उत्तर आले.



"समुद्र! असतो तरी केवढा हा समुद्र? माझ्या या विहिरीयेवढा?" असे म्हणून त्या कूपमंडुकाने विहिरीच्या एका काठापासून दुसऱ्या काठापर्यंत एक उडी घेतली.

समुद्रवासी बेडूक त्यावर म्हणाला, "मित्रा, या तुझ्या टीचभर विहिरीची तू समुद्राशी तुलना कशी बर करू जातोस?"

हे ऐकताच त्या बेडकाने टुणदिशी आणखी एक उडी मारून विचारले, "काय! एवढा मोठा आहे तुझा तो समुद्र?"

"समुद्राबरोबर विहिरीची तुलना! डोके ठिकाणावर आहे ना दादा तुझे?"

"हं! हं! म्हणे समुद्र मोठा!" कूपमंडूक उसळला, "माझ्या या विहिरीपेक्षा दुसरं काही मोठं असूच शकत नाही मुळी. हा लेकाचा लबाड असला पाहिजे. द्या ह्याला हाकलून!"

बंधूंनो, हा असला संकुचित भावच आपल्यातील कलहांचे कारण होय. मी हिंदू आहे. मी माझ्या लहानशा विहिरीत बसलो आहे, आणि तिलाच सारे जग समजत आहे! ख्रिश्चन आपल्या लहानशा विहिरीत बसला आहे, आणि तिलाच सारे जग मानत आहे. मुसलमानही तद्वतच स्वतःच्या छोट्याशा विहिरीत बसला असून तिलाच सारे जग समजत आहे! आमच्या या लहानलहान जगांचे परकोट भग्न करण्यासाठी तुम्ही अमेरिकानिवासियांनी मोठा प्रयत्न केला आहे. तुमच्या या महान उपक्रमाबद्दल मी तुम्हा सर्वांस हार्दिक धन्यवाद देतो. माझी खात्री आहे की, आज ना उद्या तुमचा हा उद्देश सफल होण्यास भगवान खचित साहाय्य करतील.

□ □ □

# हिंदुधर्म

(१९ सप्टेंबर १८९३ रोजी परिषदेसमोर वाचलेला निबंध)

**हिंदू धर्माची स्वभावसिद्ध शक्ती**

इतिहासपूर्व काळापासून तहत वर्तमान काळापर्यंत चालत आलेले तीन धर्म आज जगात विद्यमान आहेत. ते म्हणजे हिंदुधर्म, पारशीधर्म आणि यहुदीधर्म हे होत. यांतील प्रत्येकाला मोठमोठ्या आपत्तींमधून जावे लागले आहे. पण तरीसुद्धा लुप्त न होता ते अजूनही जिवंत आहेत. यावरूनच सिद्ध होते की, त्या सर्वांचे ठायी महान शक्ती वसत आहे. परंतु, यहुदी धर्म ख्रिस्ती धर्माला आत्मसात करू शकला नाही. उलट तो स्वतःच आपल्या या विश्वविजयी अपत्याकरवी स्वतःच्या जन्मभूमीतून कायमचा हद्दपार केला गेला. आणि मूठभर पारशीच काय ते आपल्या वैभवशाली धर्माची कहाणी सांगावयास आज शिल्लक आहेत. भारतात मात्र संप्रदायांमागून संप्रदाय उदयास आले. वेदप्रणीत धर्माला त्यांनी जणू मुळासकट गदगदा हालवून सोडले. परंतु, समुद्राचे पाणी भूकंपाच्या प्रबल धक्क्याने थोडा वेळ मागे हटते खरे, पण नंतर मग सर्वग्रासी महापुराच्या प्रचंड वेगाने परतून समोरील सारा प्रदेश आक्रमून टाकीत असते. त्याचप्रमाणे, या सर्व संप्रदायांचा जनकच असा वेदप्रणीत धर्म प्रथमतः अमळ मागे सरल्यासारखा होऊन, हा सारा कोलाहल शमताच, त्या त्या संप्रदायाला संपूर्णपणे आत्मसात करीत स्वतःचा विराट देह अधिकाधिक पुष्ट करीत आला आहे.

आधुनिक विज्ञानाचे नवीनात नवीन शोध ज्याच्या उच्च तत्त्वांचे मंद प्रतिध्वनीच वाटतात, त्या सर्वोत्कृष्ट वेदान्तापासून तो सामान्य मूर्तिपूजेला व तत्संबद्ध नानाविध पौराणिक कथांपर्यंत सर्वांना, इतकेच काय पण बौद्धांच्या अज्ञेयवादाला आणि जैनांच्या निरीश्वरवादाला देखील हिंदूंच्या धर्मात स्थान आहे.

यावर कुणी विचारील की, मग हे सगळे भिन्न भिन्न व सकृद्दर्शनी कमालीचे परस्परविरोधी वाटणारे भाव अशा कोणत्या एका साधारण अधिष्ठानावर अधिष्ठित आहेत? कोणत्या साधारण-केंद्राच्या आश्रयाने ते



अवस्थित आहेत? याच प्रश्नाला उत्तर देण्याचा मी आज यथाशक्ति प्रयत्न करणार आहे.

**वेदांचे नित्यत्व**

हिंदूंना अपौरुषेय वेदांपासून स्वतःचा धर्म प्राप्त झाला आहे. हे वेद आदिरहित नि अंतरहित आहेत असा त्यांचा विश्वास आहे. एखादे पुस्तक आदि-अंतरहित असते असे म्हटल्याने या श्रोतृसमाजाला हसू येईल खरे. पण, वेद म्हणजे काही विशिष्ट पुस्तके असा मुळी वेदाचा अर्थच नाही. भिन्न भिन्न व्यक्तींनी भिन्न भिन्न समयी ज्या आध्यात्मिक सत्यांचा शोध लावला, त्यांच्या चिर-संचित कोषालाच वेद असे नाव आहे. मानवजातीला ज्ञात होण्यापूर्वीही गुरुत्वाकर्षणाचा नियम आपले कार्य करीत होता, आणि संपूर्ण मानवजातीला त्याचा विसर पडला तरी तो आपले कार्य बजावीत राहीलच. आध्यात्मिक नियमांचेही असेच आहे. एका जीवात्म्याचे इतर जीवात्म्यांशी आणि सर्व जीवात्म्यांचे त्या परमपिता परमात्म्याशी जे सारे दिव्य नि विशुद्ध संबंध आहेत ते सर्व, त्यांचा शोध लागण्यापूर्वी विद्यमान होते आणि आपल्याला त्यांचा विसर पडला तरीही आहेत तसेच राहतील.

**'ऋषी'**

या आध्यात्मिक नियमांचा शोध लावणाऱ्यांना 'ऋषी' अशी संज्ञा आहे. सर्वज्ञ आणि पूर्णत्व पावलेल्या विभूती मानून आम्ही त्यांना सन्मान देत असतो. या अतिशय उन्नत ऋषींमध्ये काही स्त्रियाही होत्या हे आजच्या या श्रोतृसमाजाला सांगताना मला अत्यंत आनंद वाटत आहे.

**सृष्टी अनादी व अनंत आहे**

येथे कुणी असे म्हणू शकतील की, हे सर्व आध्यात्मिक नियम, नियम ह्या दृष्टीने अंत-रहित असतील खरे, पण त्यांना आदी किंवा आरंभ हा असलाच पाहिजे. वेद घोषणा करतात की, सृष्टीला (व म्हणूनच सृष्टीच्या नियमावलीलासुद्धा) आदीही नाही आणि अंतही नाही. आधुनिक विज्ञानानेही सिद्ध केले आहे की, सृष्टीतील एकूण शक्तीची समष्टी वा गोळाबेरीज नेहमी सारखी असते. असे असूनही जर म्हणाल की, असा एक समय होता की ज्या वेळी काहीही नव्हते, तर त्यावर मी विचारतो की मग त्या वेळी ही सर्व शक्ती

कुठे होती ? कुणी कुणी म्हणतील — अव्यक्त रूपाने ती ईश्वरातच सामावलेली होती. परंतु याचा अर्थ, ईश्वर कधी क्रियावान आणि कधी क्रियारहित असतो, म्हणजेच तो विकारशील आहे, असा होतो. प्रत्येक विकारशील वस्तू ही मिश्र पदार्थ असते आणि प्रत्येक मिश्र पदार्थ विनाशशील असतो. म्हणजे ईश्वरसुद्धा विनाशशील ठरेल ! पण हे अर्थातच शक्य नाही. आणि म्हणूनच असा समय कधीही नव्हता की जेव्हा काहीही नव्हते, अर्थात जेव्हा सृष्टी वि मान नव्हती. तात्पर्य, सृष्टीला आरंभ नाही, ती अनादी आहे. उपमाच द्यावयाची झाली तर म्हणता येईल की, स्रष्टा आणि सृष्टी ह्या दोन आदिरहित आणि अंतरहित, एकमेकांना समांतर अशा रेषा आहेत. ईश्वर नित्य-महाशक्ति-स्वरूप, सर्वविधाता असून तो प्रलयपयोधीतून ब्रह्मांडभुवनांचे नित्य सृजन करतो, काही काल त्यांचे पालन करतो, आणि फिरून सारे भंगून टाकतो. हे असेच सतत चालू आहे. हिंदू बालक आपल्या गुरूंसह प्रतिदिन म्हणत असतो — 'सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वम् अकल्पयत्' — अर्थात, विधात्याने पूर्वीप्रमाणेच सूर्य आणि चंद्र निर्माण केलेत. आधुनिक विज्ञानही हेच सांगत आहे.

### आत्मा

मी येथे उभा आहे. डोळे मिटून मी जर स्वतःच्या अस्तित्वासंबंधी विचार करू लागलो — 'मी' 'मी' 'मी' — तर माझ्यासमोर कोणती बरे कल्पना उभी राहते ? हीच की हा देहच मी होय. तर मग, पंचमहाभूतांनी बनलेला जड पिंड हा देहच मी आहे काय ? वेद म्हणतात, 'नाही.' मी देहात वसणारा 'आत्मा' आहे, मी देह नाही. देह नाहीसा होईल, पण मी मात्र नाहीसा होणार नाही. मी या देहामध्ये आहे, परंतु ज्या वेळी हा देह पतन पावेल त्या वेळीही मी विद्यमान राहीन, आणि हा देह धारण करण्यापूर्वीही मी होतोच. आत्मा कुण्या पदार्थापासून सृष्ट झालेला नाही. कारण 'सृष्टी' शब्दाचा अर्थच आहे — भिन्न भिन्न द्रव्यांचा संयोग. आणि असा संयोग म्हटला की केव्हा ना केव्हा तरी त्यांचा वियोग हा ठेवलेलाच. अतएव, आत्मा जर सृष्ट झाला असेल तर तो नाश पावणार हेही नक्कीच. म्हणून आत्मा सृष्ट पदार्थ नव्हे. कुणी कुणी जन्मापासूनच सुखात लोळत असतात, सुंदर-सुदृढ शरीर नि उल्हास-उत्साहपूर्ण मन त्यांना जन्मतःच लाभलेले असते, अभाव म्हणून कशाचाच नसतो. तर दुसरे



कुणी आजन्म दुःखात पिचत असतात, — कुणाला हात नसतात, कुणाला पायच नसतात, तर कुणी वेडसर जन्मतात आणि आपल्या भारभूत आयुष्याचा एक एक दिवस कसा तरी कंठीत असतात. हे सर्वच जण जर सृष्ट झाले असतील, हे सर्व जर त्या एका न्यायशील आणि दयामय ईश्वरानेच सृष्ट केले असतील तर कुणी सुखी अन् कुणी दुःखी असे का ? का बरे भगवंताने असा पक्षपात करावा ? तुम्ही म्हणाल, "जे या जन्मी दुःख भोगत आहेत ते परजन्मी सुखी होतील". पण म्हणून काय झाले ? दयामयाच्या व न्यायवानाच्या राज्यात का बरे एकजण तरी दुःखी असावा ? आणि दुसरे असे की, एक सृष्टिकर्ता ईश्वर मानल्याने सृष्टीतील या विषमतेचा काहीच उलगडा होत नाही. उलट यात एखाद्या सर्वशक्तिमान, स्वेच्छाचारी पुरुषाचा निष्ठुर व्यवहार मात्र दिसून येतो. करिता, हे स्वीकारणे भाग पडते की, मनुष्य सुखी वा दुःखी जन्मण्यापूर्वी अशी बहुविध कारणे घडली असली पाहिजेत की ज्यायोगे तो परिणामी सुखी वा दुःखी झाला आहे. आणि ती कारणे म्हणजे त्याचीच सारी पूर्वकर्मे होत. बरे पण, माणसाच्या शरीराची व मनाची घडण त्याच्या पितृ-पितामहादींच्या शरीरमनानुरूप होत असते असे म्हणून, आनुवंशिकतेच्या आधाराने वरील प्रश्नास समर्पक उत्तर देता यावयाचे नाही काय ? हे अगदी स्पष्टच आहे की, जीवनस्रोत जड आणि चैतन्य अशा दोन धारांनी प्रवाहित होत असतो. जड आणि जडाचे विकारच जर आत्मा, मन, बुद्धी वगैरेंचे कार्य करू शकत असतील तर मग आणखी एक स्वतंत्र आत्मा मानण्याचे काहीच प्रयोजन नाही. परंतु जडातून चैतन्यशक्ती उद्भूत झाली आहे असे सिद्ध करण्यास काहीच प्रमाण नाही. आणि म्हणूनच, एका जड पदार्थापासून सारे काही सृष्ट झाले आहे असे स्वीकार करतो म्हटल्यास, एक मूल चैतन्यच समग्र सृष्टिकार्य चालवीत असते हे स्वीकार करणेही अर्थातच तर्कसंगत, नव्हे सर्वांच्याच दृष्टीने वांच्छनीयही पण होऊन बसते. परंतु येथे या विषयाचा ऊहापोह करण्याची आवश्यकता नाही.

### आनुवंशिकता व पुनर्जन्मवाद

मानवशरीरात पितृ-पितामहादींच्या बऱ्याचशा प्रवृत्ती आनुवंशिकतेने संक्रमित होत असतात ही गोष्ट अर्थातच आपण कधीही नाकबूल करू शकणार नाही. परंतु त्याचबरोबर हेही विसरून चालणार नाही की, केवळ

शारीरिक प्रवृत्तीच फक्त अशा रीतीने संक्रमित होत असतात. ह्या निव्वळ शारीरिक प्रवृत्तींखेरीज प्रत्येक जीवात्म्याच्या स्वतःच्याही काही विशिष्ट प्रवृत्ती असतात. जो आत्मा ज्या विशिष्ट प्रवृत्तींनी युक्त असतो, तो ठीक तदनुरूप शरीराचाच आश्रय घेऊन स्वतःच्या प्रवृत्तींनुसार कार्य करण्यास समर्थ होतो. परंतु आत्म्याच्या त्या त्या प्रवृत्तीही परत पूर्वी केलेल्या कुण्या कर्मामुळेच बनत असतात. विशिष्ट प्रवृत्तींनी युक्त असलेला आत्मा आपल्या प्रवृत्तींना उपयोगी अशाच देहात जन्म घेतो, कारण दोन समान किंवा अनुरूप गोष्टींचाच संयोग होत असतो असा नियम आहे हे आधुनिक विज्ञानालाही संमत आहे. कारण, विज्ञान म्हणते की प्रवृत्ती सवयीने बनते, व सवय पुनरावृत्तीचे फल होय. म्हणून, कोणत्याही नवजात बालकाच्या प्रवृत्ती त्याने पुनः पुनः आचरलेल्या कर्मांचीच फळे होत. आणि ज्याअर्थी या प्रवृत्ती त्याने या जन्मात कमविणे शक्य नाही त्याअर्थी त्या त्याच्या मागील जन्मातूनच आलेल्या असल्या पाहिजेत असे म्हणणे भाग पडते.

### पूर्वजन्माचे स्मरण

परंतु येथे आणखी एक प्रश्न उद्भवतो. समजा की पूर्वजन्म आहे. पण मग त्या पूर्वजन्माचे काहीच कसे स्मरण आपल्याला राहू नये? या शंकेचे समाधान करणे अर्थातच विशेष अवघड नाही. सध्या मी इंग्रजीतून बोलत आहे. ती काही माझी मातृभाषा नव्हे. खरे पाहिले असता मातृभाषेतील एक देखील शब्द सध्या माझ्या मनात हजर नाही. पण मी जर आठविण्याचा यत्न करीन तर तत्क्षणी ते माझ्या स्मृतिपटलावर चमकू लागतील. यावरून हेच दिसून येते की, मनःसागराच्या केवळ पृष्ठभागावरच जे काय हेलकावत राहते त्याचाच फक्त आपल्याला बोध होत असतो. आणि आपली पूर्वार्जित ज्ञानराशी त्याच समुद्राच्या अगाध गर्भात दडलेली असते. प्रयत्नपूर्वक साधनेद्वारा तिला वर आणता येते. आणि मग, याच काय पण पूर्व पूर्व जन्मांची देखील संपूर्ण स्मृती आपल्या अंतःकरणात जागृत होईल.

पूर्वजन्मासंबंधी हेच साक्षात् प्रमाण होय. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात ताडून बघून पडताळा मिळाल्यानंतरच कोणत्याही मताची वा वादाची संपूर्ण सत्यता सिद्ध होत असते. आणि ऋषिगण समस्त जगतासमोर आव्हानपूर्वक घोषणा करीत



आहेत की, "अथांग स्मृतिसागराच्या खोल खोल प्रदेशाचा ठाव कशा रीतीने घ्यावा हे गूढ आम्ही उकलले आहे". त्यांचे अनुसरण करून यथोचित साधना करा, तुम्हालाही गत जन्मींच्या साऱ्या घटना आठवतील.

### आत्मा देहबद्ध का ?

सारांश, आपण आत्मा आहो असा हिंदूंचा विश्वास आहे. "शस्त्र त्या आत्म्याला छिन्न करू शकत नाही, अग्नी दग्ध करू शकत नाही, जल आर्द्र करू शकत नाही आणि वायू शुष्क करू शकत नाही!" हा आत्मा एक असे वर्तुळ आहे की ज्याचा परीघ कुठेच नाही, परंतु ज्याचे केंद्र प्रत्येक देहामध्ये अवस्थित आहे. आणि त्या केंद्राचे एका देहातून दुसऱ्या देहात गमन म्हणजेच मृत्यू. त्याचप्रमाणे हा आत्मा जडाच्या नियमांच्याही अधीन नाही. तो नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव आहे. परंतु कुण्या अचिंत्य कारणाने कुणास ठाऊक, तो जडाशी बांधला गेला असून स्वतःला जडच समजत असतो. प्रश्न उद्भवतो, – हा विशुद्ध, पूर्ण नि विमुक्त आत्मा जडाच्या खोड्यात अडकून त्याचा दास बनावाच का? पूर्ण असूनही आपण अपूर्ण आहोत असे त्याला वाटावेच कसे? आपल्याला असे सांगण्यात येते की या प्रश्नाची यथातथ्य मीमांसा करण्यास असमर्थ म्हणून हिंदू त्या प्रश्नाला साफ बगल देऊन म्हणतात की असला प्रश्नच मुळी संभवत नाही! कुणी कुणी पंडित आत्मा, जीव आणि त्या दोहोंच्या मधे कित्येक पूर्णप्राय (जवळ जवळ पूर्ण) सत्ता यांचे अस्तित्व कल्पितात व त्यांना नानाविध बोजड शास्त्रीय संज्ञा देऊन वरील प्रश्नाचे उत्तर देऊ इच्छितात. पण संज्ञांची खैरात म्हणजे काही उत्तर नव्हे, कारण संज्ञांच्या सरबत्तीनंतरही प्रश्न होता तसाच शिल्लक उरतो. जो पूर्ण, त्याची पूर्णता अगदी लेशभरसुद्धा ढळूच कशी शकते? जो नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव, त्याच्या त्या स्वभावाचा अणुमात्रदेखील व्यतिक्रम होऊच कसा शकतो? हिंदू या बाबतीत सर्वांपेक्षा अधिक सरळ आणि सत्यवादी आहे. फोल तर्कयुक्तीच्या मदतीने उत्तर देण्याचा तो आवही आणत नाही, अथवा उत्तर दिले म्हणून आपले पांडित्यही मिरवू इच्छीत नाही. अगदीही न कचरता वरील प्रश्नाला तोंड देण्यापुरते धैर्य त्याचे ठायी आहे. वरील प्रश्नाला तो उत्तर देतो, – "हे मला माहीत नाही. हा पूर्ण आत्मा आपल्याला

अपूर्ण कसा मानू लागला आहे, जडाच्या नियमांच्या अधीन कसा समजू लागला आहे, हे मला माहीत नाही." परंतु वस्तुस्थिती ही अशीच आहे एवढे मात्र निर्विवाद. प्रत्येकजण स्वतःला देहस्वरूप समजत असतो. हे असे का, आत्मा ह्या देहात का बरे आला आहे, याचे विवरण करण्याचा प्रयत्न आम्ही करीत नाही. 'ही सारी ईश्वराची इच्छा' असे म्हणूनही या कूट प्रश्नाचा निकाल लागण्यासारखा नाही. कारण, हिंदू जे म्हणतो की 'मला माहीत नाही', त्यापेक्षा ह्या उत्तराने तरी प्रस्तुत रहस्यावर अधिक प्रकाश तो कोणता बरे पडतो ?

**कर्मवाद**

असो तर, यावरून हेच निष्पन्न होते की, मनुष्याचा आत्मा अनादी अमर व पूर्ण आहे आणि एका देहातून दुसऱ्या देहात जाण्याचे नावच मृत्यू होय. आपली वर्तमान अवस्था आपल्या गत कर्मांचे फल असून, भावी अवस्था वर्तमान कर्मांचे फल होय. आत्मा कधी प्रगत तर कधी दुर्गत होत जन्म आणि मृत्यूच्या अखंड फेऱ्यात अविराम भ्रमत असतो. परंतु येथे आणखी एक प्रश्न उभा राहतो. तो हा की, प्रचंड तुफानात सापडलेली छोटीशी नाव जशी एकदा फेसाळ लाटेच्या उंच शिखरावर आरूढ होते आणि दुसऱ्याच क्षणी दोन लाटांमधील आ वासून बसलेल्या खोल खाईत बेगुमान झुगारली जाते, तसाच मनुष्य काय शुभाशुभ कर्मांच्या पुरेपुर हवाली असून एकसारखा कधी उन्नत तर कधी अवनत होतो आहे ? मनुष्य काय सतत फोफावणाऱ्या, उद्दाम कार्य-कारण प्रवाहात असहाय अवस्थेत सारखा इतस्ततः फेकला जात आहे ? मनुष्य काय एखाद्या क्षुद्र कीटासारखा सतत फिरणाऱ्या कर्मचक्रावर चढविला गेला आहे आणि ते चक्र, पतिशोकविव्हल विधवेच्या करुण क्रंदनाची थोडीसुद्धा पर्वा न करता, मातृपितृवियोगाने कळवळणाऱ्या बालकाच्या आर्त किंकाळ्यांकडे ढुंकूनही न बघता, समोर येईल त्याचा बेदरद चुराडा उडवीत अकुंठित गतीने निरंतर फिरत आहे ?

या विचाराने हृदय व्याकुळ होते. परंतु प्रकृतीचा नियमच हा असा आहे. मग यावर काय काही उपाय नाही ? ह्यातून सुटका होण्याचा काय काहीच मार्ग नाही ? मानवाच्या हताश हृदयाच्या अंतस्तलापासून असा करुण क्रंदनध्वनी उठू लागून त्या करुणानिधान विश्वपित्याच्या सिंहासनापर्यंत जाऊन



पोहोचला. दयामय भगवान आशापूर्ण सांत्वनावाणीच्या रूपाने एका वेदवित ऋषीच्या हृदयात आविर्भूत झाले. ईश्वरी शक्तीद्वारा प्रेरित झालेले ते महर्षी लगेच जगासमोर उभे होऊन उच्च स्वराने ती आनंदवार्ता उद्घोषित करू लागले – "हे अमृताच्या पुत्रांनो, हे दिव्यधामवासी देवांनो, या, तुम्ही सर्वजण श्रवण करा. मी त्या अनादी, महान, पुराण पुरुषास जाणले आहे. आदित्यासारखा त्याचा वर्ण, अज्ञान त्याला स्पर्श करू शकत नाही. त्याला जाणल्यानेच मृत्यूच्या तावडीतून सुटू शकाल, अन्य मार्ग नाही." *

**मनुष्य पापी नाही, तर अमृताचा पुत्र आहे.**

'अमृताचे पुत्र' – किती मधुर आणि किती उल्हासवर्धक नाव हे ! बंधूनो, या गोड नावाने मला तुम्हास संबोधू द्या. होय, तुम्ही अमृताचे अधिकारी आहात ! हिंदू तुम्हाला पापी म्हणण्याचे साफ नाकारतो. ईश्वराचे पुत्र तुम्ही, तुम्ही अमृताचे वारसदार, पवित्र, पूर्ण. तुम्ही ह्या मर्त्यभूमीवरील देवता. तुम्ही पापी ? अशक्य. मानवाला पापी म्हणणेच महापाप. विशुद्ध मानवात्म्यावर तो मिथ्या कलंकारोप मात्र आहे. बंधूंनो, तुम्ही सिंहस्वरूप असूनही स्वतःला मेषतुल्य का समजता ? उठा, मृगराजांनो, उठा, आणि आपण मेंढरे आहोत हा वृथा भ्रम झाडून टाका. तुम्ही जरामरणरहित, मुक्त आणि नित्यानंदस्वरूप आत्मा आहा. तुम्ही जड नाही. तुम्ही देह नाही. जड तुमचा दास, तुम्ही जडाचे दास नाही.

सारांश, वेद अशी घोषणा करतात की हा सृष्टिव्यापार काही भयावह, निर्दय नियमांचा दुस्तर प्रवाह नव्हे, वा कार्यकारणाचे अच्छेद्य बंधनही नव्हे. तर, या समस्त भौतिक नियमांच्या मुळाशी, जडाच्या प्रत्येक अणुरेणूत आणि शक्तीच्या प्रत्येक स्पंदनात असा एक पुराण पुरुष अंतर्बाह्य विराजमान आहे

---

* शृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्राः आ ये धामानि दिव्यानि तस्थुः

* * *

वेदाहमेतं पुरुषं महान्तम् आदित्यवर्णं तमसः परस्तात्
तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ॥
– श्वेताश्वर उपनिषद

की, "ज्याच्या आदेशाने वायू लहरत असतो, अग्नी धडकत असतो, मेघ वर्षत असतो आणि मृत्यू पृथ्वीतलावर फिरत असतो". *

आणि अशा त्या पुरुषाचे स्वरूप कसे आहे ? तो सर्वव्यापी, शुद्ध, अपापविद्ध, निराकार आणि सर्वशक्तिमान असून सर्वांवरच त्याची पूर्ण दया आहे. तू आमचा पिता, आमची माता, तूच आमचा परम प्रेमास्पद प्राणसखा. तूच समस्त शक्तींचे मूळ. तू अगणित ब्रह्मांडभुवनांचा भार धारण करून आहेस. प्रभो, या क्षुद्र जीवनाचा भार वाहण्यापुरते सामर्थ्य मला दे" — वेदवित् ऋषिगण असे उद्‌गान करीत असत. आम्ही कशाने त्याचे पूजन करावयाचे ? प्रेमाने. त्याला परम प्रेमास्पद मानून, इहलौकिक वा पारलौकिक समस्त प्रिय वस्तूंपेक्षाही प्रियतम समजून आम्ही त्याची अर्चना करावयास हवी.

शुद्ध प्रेमासंबंधी वेदांचा हा असा आदेश आहे. आणि आता, हिंदू लोक भूभारहारी हरीचा पूर्णावतार समजून ज्याची भक्ती करितात त्या भगवान श्रीकृष्णांनी हे प्रेमतत्त्व कसे पूर्णत्वास नेले, व त्यासंबंधी काय उपदेश दिला हे आपण बघू या. पद्मपत्र पाण्यात वाढूनही जसे पाण्याने कधी भिजत नाही, तसेच माणसानेही या संसारात वावरताना हृदय भगवंताला समर्पण करून कर्म करीत निर्लिप्त भावाने राहिले पाहिजे, अशी श्रीकृष्णांची शिकवण आहे. इहलोकी वा परलोकी सुखाचा मोबदला मिळण्याच्या आशेने ईश्वरावर प्रेम करणे वाईट नाही. परंतु त्याच्यावर प्रेमाकरताच प्रेम करणे केव्हाही श्रेष्ठ. त्याच्या चरणी अशीच प्रार्थना करणे उचित की, "हे जगदीशा, मी तुमच्यापाशी धन, संतान वा विद्या काहीही मागत नाही. तुमची इच्छाच असेल तर, प्रभो, वारंवार गर्भवासही भोगण्यास मी तयार आहे. पण, भगवन, एवढेच देणे द्या की जेणेकरून सर्व अवस्थात मोबदल्याची आशा न बाळगता निःस्वार्थपणे मी तुमच्यावर प्रेम करू शकेन." †

---

* भयात् अस्य अग्निः तपति, भयात् तपति सूर्यः।
भयात् इंद्रश्च, वायुश्च, मृत्युः धावति पंचमः॥
— कठोपनिषद्

† न धनं न जनं न च सुंदरीं, कवितां वा जगदीश कामये।
मम जन्मनि जन्मनीश्वरे भवतात् भक्तिरहैतुकी त्वयि॥



## अहेतुकीभक्ती

तत्कालीन आर्यावर्ताचे सम्राट, धर्मनंदन युधिष्ठिर हे श्रीकृष्णांचे परम अनुगत शिष्य म्हणून प्रसिद्ध होते. आपल्या शत्रूंकडून सिंहासनच्युत होऊन त्यांना एकदा आपल्या सम्राज्ञीसह हिमालयाच्या पायथ्यालगतच्या अरण्याचा आश्रय घ्यावा लागला होता. तेथे एके प्रसंगी राजमहिषीने त्यांना विचारले की, "नाथ, आपण इतके धर्मशील आहात की लोक आपल्याला धर्मराज म्हणून संबोधतात. परंतु असे असूनही आपल्या हालअपेष्टांना सीमा नसावी ना ?" सम्राटाने उत्तर दिले, "प्रिये, बघ, ह्या हिमगिरीकडे बघ. अहाहा, किती सुंदर नि किती भव्य आहे हा ! मी त्यावर अत्यंत प्रेम करतो. गिरिराज मला काहीही उपहार देत नाही, पण तरीसुद्धा सुंदर आणि भव्य वस्तूंवर प्रेम करणे माझा स्वभावच असल्याकारणे मी त्यावर अतिशय प्रेम करतो. ईश्वरावरही मी याच कारणास्तव प्रेम करतो. तोच निखिल सौंदर्य-सुषमेचे नि दिव्य-भव्यतेचे मूल, तोच प्रेमाचा एकमेव योग्यतम आस्पद. मला त्याचेजवळ काहीही मागावयाचे नाही. त्याची इच्छा असेल तेथे तो मला ठेवो, सर्वच अवस्थात मी त्याच्यावर प्रीती करीन. मला प्रेमात विनिमय करता येत नाही. देवी, मी धर्मवणिक नाही". *

वेद सांगतात की, आत्मा स्वरूपतः ब्रह्म आहे. तो पंचभूतांच्या बंधनांत सापडला आहे, इतकेच. ह्या बंधनांतून मोकळा होताच तो पूर्ववत पूर्णत्वास प्राप्त होतो. या अवस्थेचेच नाव मुक्ती. मुक्ती म्हणजे अपूर्णता, जन्ममृत्यू, आधिव्याधी वगैरेंच्या कचाट्यातून सुटका. ईश्वराची कृपा झाली तरच केवळ आत्म्याचे हे बंधन गळून पडू शकते. आणि पवित्र स्वभावाच्या लोकांवरच त्याची कृपा होत असते. म्हणून पवित्रताच त्याच्या अनुग्रहप्राप्तीचा एकमेव उपाय होय. जेव्हा त्याची कृपा होते तेव्हा शुद्ध वा पवित्र हृदयात तो प्रकाशित

---

* नाहं कर्मफलान्वेषी राजपुत्रि चराम्युत
ददामि देयमित्येव यजे यष्टव्यमित्युत।
धर्म एव मनः कृष्णे स्वभावाच्चैव मे धृतम्
धर्मवाणिज्यको हीनो जघन्यो धर्मवादिनाम्।
— महाभारत, वनपर्वम्.

होतो. त्या निर्मल, विशुद्ध मानवाला याच जीवनात त्याचे दर्शन होते. "तेव्हाच – केवळ तेव्हाच त्याची समस्त कुटिलता नाश पावते, सर्व संदेह दूर होतात. त्याच्या समग्र कर्मांचा क्षय होऊन तो कर्मफलाच्या तावडीतून पूर्णपणे सुटतो." * हेच हिंदुधर्माचे लक्ष्य आहे, हाच हिंदुधर्माचा यथार्थ भाव आहे.

### प्रत्यक्षानुभूतीच हिंदुधर्माचा मूलमंत्र

हिंदुलोक केवळ मते वा शास्त्रचर्चाच घेऊन राहू इच्छीत नाहीत. अतींद्रिय सत्ता जर असेलच तर ते तिचे साक्षात दर्शन घेऊ इच्छितात. जर जडाशी संबंध नसलेला आत्मा असेल, जर दयामय सर्वव्यापी परमात्मा असेल, तर ते त्याचा साक्षात्कार करून घेऊ इच्छितात. कारण, त्याचे दर्शन झाल्याखेरीज संदेह कधीही नाहीसे होत नाहीत. म्हणूनच हिंदू साधुसंत आत्मा वा ईश्वर यासंबंधी सर्वोकृष्ट प्रमाण हेच देत असतात की, 'मला आत्मसाक्षात्कार झाला आहे, मला ईश्वराचे दर्शन घडले आहे.' प्रत्यक्ष अनुभवाखेरीज कुणीही पूर्ण होऊ शकत नाही. अपरोक्षानुभूतीच हिंदुधर्माचा मूलमंत्र होय – केवळ विश्वास ठेवणे नव्हे, तर जीवनात उतरविणे.

सारांश, आपण पाहिले की, अविरत साधनेद्वारा पूर्णता प्राप्त करणे – देवता बनणे, ईश्वराचे सान्निध्य आणि त्याचे दर्शन यांचा लाभ करून घेणे हेच हिंदूंच्या समस्त साधनाप्रणालीचे लक्ष्य होय. आणि अशा रीतीने ईश्वर-सान्निध्याचा लाभ करून त्याचे दर्शन करून घेऊन, त्या सर्वलोकपिता ईश्वराप्रमाणे पूर्ण होणे हाच हिंदूंचा धर्म होय.

पूर्ण झालेल्या माणसाची अवस्था कशी असते? तो नित्यानंद उपभोगतो. सर्व लाभांत श्रेष्ठ असा परमानंदधाम ईश्वराचा लाभ झाल्याने तो परमानंदाचा अधिकारी होतो.

### 'ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति'

समस्त हिंदू लोकांचे याविषयी एकमत आहे. भारतातील सर्वच संप्रदायांची याविषयी एकवाक्यता आहे. आता, हे उघडच आहे की, तुरीय वा

* भिद्यते हृदयग्रन्थिः छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥

– मुंडक उपनिषद



निर्विकल्प अवस्थेचेच नाव पूर्णावस्था आहे, आणि ती निर्विकल्पावस्था एकमेव, अद्वितीय व गुणातीत आहे. तीत व्यक्तित्व राहू शकत नाही. म्हणून जेव्हा एखादा आत्मा त्या निर्विकल्पावस्थेत जातो तेव्हा तो ब्रह्माशी एक होतो. ब्रह्माशी एक झालेला आत्मा स्वतःच सत्-स्वरूप, ज्ञान-स्वरूप आणि आनंद-स्वरूप होऊन जाईल, कारण तो मुळी स्वरूपतःच द्वैतज्ञानविवर्जित ब्रह्म आहे. कित्येक पाश्चात्त्य पंडितांनी आपल्या ग्रंथांतून, आत्म्याच्या ह्या व्यक्तित्वविलयाचा जडावस्था म्हणून उल्लेख केल्याचे पाहण्यात येते. यावरून त्यांची अनभिज्ञताच दिसून येते. "ज्याला जखमेचा अनुभव नाही तोच दुसऱ्यांच्या वणांची थट्टा करीत असतो."

### ब्रह्मत्वप्राप्ती वा समाधी जडावस्था नव्हे.

मी तुम्हाला सांगतो की, ही अत्युच्च अवस्था जडावस्था नव्हे. ज्याअर्थी या एका टीचभर देहाविषयी मीपणाची जाणीव मला सुखदायक वाटू शकते, त्याअर्थी दोन शरीरांविषयी तसली जाणीव मला केव्हाही अधिक सुखदायक वाटणार. याप्रमाणे तीन, चार, पाच अशी देहांची संख्या जितकी वाढत जाईल तितक्या प्रमाणात माझ्या सुखाचीही वृद्धी होत राहील. आणि अशा रीतीने 'ज्या वेळी या अखिल विश्वाविषयीच मला अहंबोध वाटू लागेल, त्या वेळीच माझ्या आनंदाची पराकाष्ठा होईल.' म्हणून त्या विश्वदेहाचा लाभ करू जाता या क्षुल्लक, लहानशा देहाचा कारावास मला झिटकारावाच लागेल. मी जेव्हा जीवन-स्वरूप होऊन जाईन तेव्हाच मृत्यूच्या पाशातून मुक्त होऊ शकेन. मी जेव्हा आनंदरूप होऊन जाईन तेव्हाच दुःखाची निवृत्ती होऊ शकेल. मी जेव्हा ज्ञानमय होऊन जाईन तेव्हाच अज्ञानाच्या मगरमिठीतून सुटू शकेन. आधुनिक विज्ञानही अखेर ह्याच सिद्धान्ताप्रत येऊन ठेपले आहे. विज्ञानाने सिद्ध केले आहे की, आपण या देहाला इंद्रियगोचर आणि एकरूप समजत असतो खरे, पण वस्तुतः तो तसा नाही. आपले तसे समजणे निव्वळ भ्रम होय. कारण, या खंडहीन जडसमुद्रामधे लाटेप्रमाणे तो एकसारखा बदलत आहे, म्हणजे तो प्रतिक्षणीच नूतन होत आहे. याउलट माझा चैतन्यांश असा परिवर्तनशीलही नाही व भ्रमात्मकही नाही, आणि म्हणूनच तो सर्वथैव सत्य आहे, आणि ह्याच कारणास्तव 'मी एकमेव, अद्वितीय आत्मा आहे' हा अद्वैतबोधच केवळ तर्कसंगत सिद्धान्त होय.

**अद्वैतच धर्मविज्ञानाचा अंतिम सिद्धान्त होय.**

विज्ञान एका मूल वस्तूच्या वा शक्तीच्या अन्वेषणाखेरीज आणखी काहीच नाही. आणि कुण्याही विज्ञानशास्त्राने एकदा त्या मूल वस्तूचा वा शक्तीचा शोध लावला की मग ते उन्नतीच्या चरम सीमेस जाऊन पोहोचले असेच म्हणावे लागते. उदाहरणार्थ, रसायनशास्त्र जर असे एक मूलद्रव्य शोधून काढील की ज्यापासून इतर सर्व पदार्थ तयार करता येतात, तर त्याने उन्नतीचा अखेरचा टप्पा गाठला असेच म्हणावे लागेल. पदार्थविज्ञानशास्त्र जर अशी एक मूल शक्ती शोधून काढील की जिच्यातून इतर शक्ती उद्‌भूत झालेल्या आहेत, तर ते पूर्णत्व पावेल. आणि, धर्मविज्ञानालाही ज्या वेळी ते एकमेव मूल कारण गवसेल की जे ह्या मर्त्यलोकी एकमात्र अमृतस्वरूप आहे, जे या नित्य परिवर्तनशील जगताचा एकमात्र अचल अढळ आधार आहे, आणि जे एकमात्र परम-आत्मा असून इतर आत्मे त्याची प्रितिबिंबे आहेत, त्याच वेळी ते धर्मविज्ञान पूर्ण झाले. अशा रीतीने अनेकेश्वरवाद, द्वैतवाद प्रभृतींतून मार्ग काढून अद्वैतवादात उपस्थित झाल्यानंतर धर्मविज्ञान मग आणखी पुढे जाऊ शकत नाही.

**हिंदू धर्म व विज्ञान यांचा समन्वय**

विज्ञानशास्त्रांचेही हेच अंतिम ध्येय आहे. सर्वच विज्ञानशास्त्रांना अंती ह्याच सिद्धान्ताप्रत यावे लागणार आहे. आजकाल विज्ञानशास्त्रज्ञ या दृश्यमान जगताला 'सृष्टी' संज्ञा देऊ इच्छीत नाहीत. ते म्हणतात की, जगत क्षणोक्षणी भिन्न आकार धारण करून प्रतिमुहूर्ती नव नव रूपाचा 'विकास' करीत आहे, इतकेच. हिंदू लोक चिरकाल हीच कल्पना हृदयात बाळगीत आले आहेत. आणि आधुनिक वैज्ञानिक सांप्रत अधिक ओजस्वी भाषेत नानाविध प्रमाणादिकांच्या साहाय्याने दृढपणे आपल्याच मताला पुष्टी देत असल्याचे बघून हिंदूंना आनंदच वाटत आहे.

आता आपण वेदान्ताच्या उत्तुंग शिखरावरून खाली उतरून अज्ञजनांच्या धर्माकडे वळू या.

**तथाकथित मूर्तिपूजा**

मी तुम्हाला प्रारंभीच सांगून ठेवतो की, भारतात अनेकेश्वरवाद नाही.



कोणत्याही देवालयात एका बाजूला उभे राहून जर कुणी श्रवण करील तर त्याला ऐकू येईल की पूजक देवमूर्तीवर ईश्वराच्या समग्र गुणांचा, फार काय पण सर्वव्यापित्वाचा देखील आरोप करीत आहे. ह्याला अनेकेश्वरवाद अथवा कुण्या विशिष्ट देवाचा प्राधान्यवाद * प्रभृती कोणता एखादा वाद म्हणूनही चालणार नाही. गुलाबाला हवे ते नाव द्या, त्याने त्याच्या सुवासाची काहीच हानी होणार नाही. आणि, केवळ एखादे नाव दिल्यानेच वस्तूच्या स्वरूपाचे यथार्थ स्पष्टीकरण होते असेही नाही.

लहानपणी मी एकदा एका ख्रिस्ती धर्मप्रचारकाला काही लोकांसमोर धर्मासंबंधी व्याख्यान देताना ऐकले होते. नाना प्रकारच्या गोड गोड गोष्टी बोलता बोलता स्वारी म्हणून गेली, "हे भ्रान्त जीव हो! मी जर तुमच्या मूर्तीला ह्या काठीचा एक तडाखा लगावला तर ती माझे काय बरे करू शकेल?" श्रोत्यांपैकी एकाजणाने ताडकन उत्तर दिले, "मी तुमच्या देवाला शिव्या दिल्या तर तो तरी माझे काय करील?" पाद्री उत्तरला, "तुम्ही मेल्यानंतर तो तुम्हाला शिक्षा करील". त्यावर त्या हिंदूनेही सडेतोड जबाब दिला, "तर मग, तुम्ही मेल्यानंतर माझी देवताही तुम्हाला योग्य बक्षीस देईल!"

फळावरून वृक्षाच्या गुणावगुणांची पारख होत असते. आणि म्हणून, मूर्तिपूजक म्हणून ज्यांची हेटाळणी होत असते त्यांच्यात जेव्हा मला असे लोक आढळतात की ज्यांच्यासारख्या चारित्र्यवान, आध्यात्मिक भावपूर्ण आणि प्रेमळ विभूती कधीही नि कुठेही गवसत नाहीत, तेव्हा हा प्रश्न आपोआपच माझ्या मनात उदय पावतो की, 'पापातून कधी तरी अशी पवित्रता जन्मणे शक्य आहे काय!'

खुळचट समजूत वा अंधविश्वास मनुष्याचा शत्रू खराच, पण संकुचितपणा त्याहीपेक्षा भयंकर शत्रू होय. हेच पाहा ना, ईश्वर जर 'सर्वव्यापी' आहे तर मग ख्रिस्ती लोक त्याची आराधना करण्यासाठी चर्च नावाच्या एका स्वतंत्र स्थानी का बरे जात असतात? का बरे ते क्रॉसला इतके पवित्र मानतात? प्रार्थनेच्या वेळी ते वर आकाशाकडे दृष्टी का बरे लावतात?

* हेनोथिइझम् – एका प्रमुख देवाच्या सत्तेखाली अनेक श्रेणींच्या देवतांचे अस्तित्व मानणे.

## मूर्तीशिवाय विचार अशक्य

कॅथॉलिक संप्रदायाच्या धर्ममंदिरात इतक्या मूर्ती कशासाठी बरे असतात ? प्रार्थनासमयी प्रॉटेस्टंट उपासकांच्या मनश्चक्षूंसमोर इतक्या मूर्ती उभ्या राहतात, त्या तरी का बरे ? बंधूंनो, श्वासोच्छ्वासाखेरीज आपण ज्याप्रमाणे जिवंत राहू शकत नाही, त्याचप्रमाणे मानसिक मूर्तीखेरीज आपण कसलासुद्धा विचारही करू शकत नाही. कोणतीही भौतिक आकृती पाहताक्षणी आपल्या मनात तदनुरूप कल्पना उदय पावत असते, अथवा मनात एखादी कल्पना उदय पावताच तदनुरूप आकृतीही समोर उभी राहत असते. आणि हिंदू आपल्या उपासनेत बाह्य प्रतीकाचा अवलंब करीत असतो तो तरी ह्याच कारणास्तव. आपण ज्याची प्रार्थना करतो त्या उपास्यावर चित्त स्थिर ठेवण्यात त्या मूर्तीचे आपल्याला साहाय्य होते असेच तो तुम्हाला सांगेल. एरवी, मूर्ती म्हणजे ईश्वर नव्हे हे तुमच्याइतकेच त्यालासुद्धा अवगत असते, ही मूर्तीच सर्वव्यापी नाही हे त्याला देखील पुरेपूर ठाऊक असते. आणि मी म्हणतो, बहुतेक लोकांना, किंबहुना प्रायः सर्वच लोकांना या सर्वव्यापित्वाचा खरा अर्थ कितीसा बरे कळतो ? केवळ शब्दापलीकडे काहीच नाही. ईश्वराला काय क्षेत्रफळ आहे ? नाही ना ? पण तरीही 'सर्वव्यापी' शब्द उच्चारताक्षणी आपल्या अंतःकरणात फार फार तर विस्तृत आकाशाची अथवा विशाल भूमीची कल्पना सोडून आणखी काय बरे उदय पावत असते ?

तात्पर्य, आपली मनोरचनाच अशी आहे की आपली अनंतत्वाची कल्पना अनंत आकाशाशी किंवा अपार समुद्राशी आपोआपच जोडली जावी. म्हणूनच काहीजण स्वतःची सर्वव्यापित्वाची व पावित्र्याची कल्पना स्वतःच्या स्वभावानुसार चर्च, मशीद, वा क्रॉसरूपी प्रतीकाशी जोडत असतात. आणि म्हणूनच हिंदूंनीही पावित्र्य, नित्यत्व, सर्वव्यापित्व प्रभृती भाव देवदेवींच्या नाना मूर्तींशी जोडले आहेत. फरक एवढाच की काहीजण आपली उभी हयात एखाद्या चर्चरूपी प्रतीकालाच वाहून त्यातच कृतकृत्यता मानतात आणि त्यापलीकडे मुळीच प्रगती करीत नाहीत. कारण, धर्म म्हणजे काही ठरीव सांप्रदायिक मते मानणे आणि आपल्या लोकांवर उपकार करणे एवढेच त्यांना ठाऊक असते. परंतु, हिंदूंनी मात्र अपरोक्षानुभवालाच धर्माचे अंतिम लक्ष्य



बनविले आहे. मानवाने ईश्वराचा साक्षात्कार करून घेतला पाहिजे, ईश्वराशी एक होऊन गेले पाहिजे. म्हणून त्यांच्या मते मूर्ती म्हणा, मंदिर म्हणा की शास्त्रग्रंथ म्हणा, सर्वच धर्मजीवनाच्या बाल्यावस्थेतील केवळ साहाय्यक साधने आहेत. ती धर्मजीवनाचे अंतिम उद्देश्य वा लक्ष्य असू शकत नाहीत.

## मूर्तिपूजा खालची अवस्था होय —

त्याने सारखे 'पुढे' गेले पाहिजे, मधेच कुठेही थांबता कामा नये. "बाह्यपूजा, मूर्तिपूजा प्रथमवास्थेतील क्रिया होत. नंतर किंचित उन्नत झाल्यावर मानसिक प्रार्थना. परंतु ईश्वरसाक्षात्कारच सर्वोत्कृष्ट आणि सर्वश्रेष्ठ अवस्था होय". * हिंदूंचे धर्मशास्त्र हीच शिकवण देत आहे. जो साधक हात जोडून, गुडघे टेकून देवमूर्तीसमोर नतमस्तक होऊन पूजेसाठी बसत होता, तोच पुढे ज्ञान झाल्यानंतर काय उद्‌गार काढीत आहे ते ऐका — "सूर्य त्याला प्रकाशित करू शकत नाही. चंद्रमा, तारागण, आणि ही विद्युतही त्याला प्रकाशित करू शकत नाही. मग अग्नी त्याला कसा बरे प्रकाशित करणार ? तो स्वयंप्रकाशच ह्या साऱ्यांना प्रकाशित करतो".† परंतु आता त्या साधकाच्या बाह्यपूजेचा त्याग होऊन गेला आहे म्हणून अन्यधर्मीयांप्रमाणे तो मूर्तिपूजेला पापजनक समजून तिची घृणा मात्र करीत नाही. धर्मजीवनातील तीही एक अत्यावश्यक अवस्था होय हे तो पूर्णपणे जाणून असतो. बाल्यच तारुण्यादिकात परिणत होत असते. एखादा वृद्ध जर बाल्य वा तारुण्याला पापाची अवस्था म्हणून त्यांची घृणा करील तर तो हास्यास्पदच ठरणार नाही काय ? शिवाय, हिंदुधर्मात मूर्तिपूजा सर्वांसाठीच विहित आहे असेही नाही.

---

* उत्तमो ब्रह्मसद्भावो ध्यानभावस्तु मध्यमः।
स्तुतिर्जपोऽधमो भावो बाह्यपूजाऽधमाधमा॥

† न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकम्
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तम् अनुभाति सर्वं
तस्यभासा सर्वमिदं विभाति ॥

— कठोपनिषद

### — पण भ्रमात्मक मात्र नव्हे.

परंतु मूर्तीच्या साहाय्याने आपल्या ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती करून घेणे जर एखाद्याला सोपे जात असेल तर तसे करण्याला पाप म्हणणे कितपत उचित होईल ? इतकेच काय पण त्या अवस्थेमधून पलीकडे गेल्यानंतर देखील तिला त्याने भ्रमात्मक म्हणणे उचित नाही. हिंदूंच्या मते मानव भ्रमातून सत्याकडे जात नसून सत्यातून सत्याकडे — खालील सत्यातून वरील वरील सत्याकडे जात असतो. हिंदूंच्या दृष्टीने अज्ञजनांच्या निकृष्ट धर्मापासून तो वेदान्ताच्या अद्वैतवादापर्यंत सर्वच धर्म त्या अनादी परब्रह्माला आकळण्याची साधने आहेत, परब्रह्मापर्यंत पोहोचविणाऱ्या पायऱ्या आहेत. जन्म आणि अवस्था यांच्या अनुसार ज्याला जे साधन उपयोगी असेल त्याचा त्याने अवलंब करून वर वरचा टप्पा गाठीत गेले पाहिजे. थोडक्यात, प्रत्येक जीवात्मा हा एखाद्या गरुडपक्ष्याच्या पिलासारखा क्रमाक्रमाने अधिकाधिक उंच भराऱ्या घेत नभोमंडलात वर वर उडत असतो. आणि याप्रमाणे पूर्वीपेक्षा अधिकाधिक बलशाली होत होत अंती त्या महान सूर्याजवळ जाऊन पोहोचत असतो.

विविधतेमधे एकत्व हाच प्रकृतीचा नियम आहे. हिंदूंनी तो विशेषेकरून जाणला आहे. इतर धर्म काही ठराविक मतांचे प्रतिपादन करतात आणि समस्त समाजाला तीचं मानण्यास सक्तीने भाग पाडतात. समाजासमोर ते जणू एकाच मापाचे अंगरखे ठेवतात, आणि राम, श्याम, हरी प्रभृती सर्वांनाच ते घालण्याचा हुकूम फर्मावितात. जर हरीच्या वा श्यामच्या अंगात तो होत नसेल तर त्याने अंगरख्याशिवाय खुशाल उघडेच राहावे. हिंदूंनी पूर्णपणे जाणले आहे की सापेक्ष साधनांचे साहाय्य घेऊनच निरपेक्ष तत्त्वाची धारणा, उपलब्धी वा आविष्कार शक्य आहे. म्हणून त्यांच्या मते, हिंदूंच्या मूर्ती, ख्रिस्त्यांचा क्रॉस, मुसलमानांचा चांद वगैरे सारीच आध्यात्मिक उन्नतीस साहाय्यभूत होत असतात. ते असे कधीच म्हणत नाहीत की अशा प्रकारचे साहाय्य सर्वांनाच आवश्यक आहे. परंतु अधिकांश लोकांना या सर्व गोष्टींची अत्यंत मदत होते यातही काही संशय नाही. अतएव, ज्यांना त्यांची आवश्यकता भासत नाही त्यांना, 'इतरांनी त्या गोष्टींचे साहाय्य घेणे चूक आहे' असे म्हणण्याचा मुळीच अधिकार नाही.



### हिंदू व ख्रिस्ती धर्मवेड्यांतील फरक

आणखीही एक गोष्ट तुम्हाला सांगून ठेवणे माझे कर्तव्य आहे. भारतात मूर्तिपूजा म्हणजे काही भयावह बाब नाही. दुराचार माजेल असे तिच्यात काहीही नाही. उलट, दुर्बल साधकांना धर्माच्या उच्च भावांचे आकलन करण्यास ती समर्थ बनविते. आता, हिंदूंतही अनेक दोष आहेत, नाहीत असे नाही. त्यांच्यातही कधीकधी अपवादात्मक उदाहरणे जरूर आढळतील. पण लक्षात ठेवा, हिंदू लोक यातना देतील ती स्वतःच्याच देहाला, परधर्मीयांचे गळे कापण्यापर्यंत त्यांची मजल कधीही जाणार नाही. धर्मवेडा हिंदू एखादे वेळी स्वतःलाच चितेत जाळून घ्यावयास सरसावेल खरा, पण विधर्मी लोकांना जिवंत जाळून टाकण्यासाठी तो कधीच अग्नी पेटविणार नाही. आता हिंदूंच्या असल्या कृत्यांना तुम्ही दुर्बलता खुशाल म्हणा; पण तो दोष बिचाऱ्या हिंदुधर्माच्या माथी मारणे मात्र अगदीच अनुचित होईल. ख्रिस्ती लोकांनी चेटकिणी म्हणून शेकडो हजारो स्त्रियांना जे उभे जाळले, त्याचे खापर कुणाच्या डोक्यावर फोडावयाचे ? ख्रिस्ती धर्माच्या की त्याच धर्मवेड्यांच्या !

### हिंदुधर्माची उदारता

सारांश, हिंदूंच्या दृष्टीने जगातील निरनिराळे धर्म म्हणजे नाना रुचींच्या नरनारींसाठी नाना अवस्थांमधून त्या एकाच ईश्वराकडे जाण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. प्रत्येक धर्माचा उद्देश देहबोधाला ब्रह्मबोधात परिणत करणे हाच आहे. आणि त्या एकाच ईश्वराने समस्त धर्ममार्ग उत्पन्न केले आहेत. पण मग हे सारे धर्म इतके परस्परविरोधी का असावेत ? हिंदू म्हणतात, हा विरोध वरवरचा आहे, खरोखरचा नाही. भिन्नभिन्न अवस्थेतील विभिन्नस्वभावयुक्त लोकांच्या उपयोगी पडण्यासाठी ते एकच सत्य ही अशी परस्परविरोधी रूपे धारण करीत असते.

एकच प्रकाश निरनिराळ्या रंगांच्या काचांतून येत असल्यामुळे वेगवेगळा भासत आहे. तऱ्हतऱ्हेच्या स्वभावांसाठी ही असली विविधता आवश्यक पण आहे. परंतु सर्वांच्या अंतरंगात — प्रत्येक धर्मामधे तेच एक सत्य विराजमान आहे. भगवंतांनी कृष्णावतारी हिंदूंना शिकविले आहे की, "ज्याप्रमाणे माळेतील सर्व मण्यांतून एकच दोरा ओवलेला असतो, त्याप्रमाणे

सर्वच धर्मांत माझा वास आहे", "जे जे म्हणून अतिशय प्रभावशाली वा अतिशय सुंदर व पवित्र असेल, ते ते सर्व माझ्याच शक्तीचा आविष्कार आहे असे समज". आणि ह्या शिकवणुकीचा परिणाम काय झाला आहे ? मी अगदी ठासून सांगू शकतो की, संपूर्ण संस्कृत दर्शनशास्त्रात 'हिंदूच फक्त मुक्तीचा अधिकारी, दुसरा कुणी नाही' असा भाव कुणीही दाखवून देऊ शकणार नाही. भगवान कृष्णद्वैपायन व्यास म्हणतात, "परजातीच्या आणि परधर्माच्या लोकांमधेही आपल्याला सिद्धपुरुष आढळून येतात".

### हिंदुधर्माचा बौद्ध व जैन धर्मांशी समन्वय

आणखी एक गोष्ट. कुणी असा प्रश्न करतील की, पक्के आस्तिक हिंदू लोक अज्ञेयवादी बौद्धांच्या आणि निरीश्वरवादी जैनांच्या मतांवर कसा विश्वास ठेवू शकतात ? बौद्धांचा आणि जैनांचा ईश्वरावर भरवसा नाही खरा, पण मनुष्यामधे देवत्वाचा किंवा ईश्वरत्वाचा विकास करणेच त्यांच्याही धर्माचे एकमेव लक्ष आहे. ते एक निराळा परमेश्वर मानोत की न मानोत, पण स्वतः देवता बनणेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. आणि इतर सर्व धर्मांचे उद्दिष्ट तरी यापेक्षा वेगळे ते कोणते आहे ? त्यांनी जगत्पिता जगदीश्वर पाहिला नाही खरा, पण त्याचा पुत्ररूपी आदर्श मनुष्य, बुद्धदेव वा जिनदेव त्यांनी पाहिला आहे. आणि पुत्राला पाहिले की पित्यालाही पाहणे झालेच.

### सार्वजनीन धर्म

बंधूंनो, हिंदुधर्माची ही ठोकळ रूपरेषा मी तुमच्यापुढे मांडली आहे. आपले ध्येय प्रत्यक्षात उतरविताना हिंदू लोक कित्येक बाबतीत कदाचित यशस्वी झाले नसतील. पण जर कधी काळी एका सर्वसंमत धर्माचा उदय व्हावयाचा असेल, तर तो धर्म कधीही स्थल-कालांनी मर्यादित असणार नाही. ज्या अनंत ईश्वराविषयी तो उपदेश देईल, त्या ईश्वराप्रमाणेच तो स्वतःही अनंत राहील. तो धर्मरवी कृष्णभक्तांना आणि ख्रिस्तभक्तांना, महात्म्यांना आणि दुरात्म्यांना सारखाच उजेड देईल. तो केवळ ब्राह्मणी धर्म, वा बौद्ध धर्म, वा ख्रिस्ती धर्म, वा मुसलमान धर्म असणार नाही. हे सर्वच त्यात समाविष्ट होतील, आणि शिवाय आणखीही हवी तितकी वाढ होण्यास त्यात पूर्ण वाव राहील. तो धर्म इतका उदार आणि सार्वजनीन राहील की आपले असंख्य बाहू पसरून विश्वातील समस्त नरनारींना आलिंगन देऊन तो हृदयाशी धरील. ज्याची बुद्धी



पशुतुल्य आहे असे म्हटल्यासही अतिशोयोक्ती होणार नाही अशा माणसापासून तो आपल्या हृदय-मनाच्या लोकोत्तर गुणांमुळे ज्याने समस्त मानवजातीच्या शिरोभागी स्थान मिळविले आहे आणि समाज ज्याला साधारण मानव न मानता देवतेप्रमाणे ज्याची पूजा करतो, अशा नररत्नांपर्यंत सर्वांनाच तो धर्म आपल्या अंकावर स्थान देईल. त्या धर्माची घडणच अशी राहील की तीत परमताविषयी असहिष्णुतेच्या किंवा छळाच्या भावनेला थाराच मिळणार नाही. आणि प्रत्येक नरनारीच्या अंतर्यामी देवत्व वसत आहे हे जाणून, मनुष्यजातीला स्वतःच्या दिव्य स्वरूपाची प्राप्ती करून घेण्यासाठी साहाय्य करण्यातच त्या धर्माची समस्त शक्ती प्रयुक्त होईल.

असला सार्वजनीन धर्म जगासमोर ठेवा म्हणजे सर्वच जाती तुमचे अनुसरण करतील. सम्राट अशोकाची धर्मपरिषद केवळ बौद्धमताचीच परिषद होती. इतर धर्मांना स्थान असल्यामुळे अकबराची धर्मसभा अधिक अर्थपूर्ण होती यात संशय नाही. पण अंती तीही एक राजदरबारच ठरली. 'प्रत्येक धर्मात ईश्वराचे अधिष्ठान आहे' या महान सत्याची समस्त जगासमोर घोषणा करण्याचे भाग्य अमेरिकेकरिताच राखून ठेवलेले होते.

जो हिंदूंचे ब्रह्म, पारशी लोकांचा अहुरमझ्द, बौद्धांचा बुद्ध, मुसलमानांचा अल्ला, यहुदी लोकांचा जिहोवा आणि ख्रिश्चनांचा स्वर्गस्थ पिता आहे, तो तुम्हाला तुमचा हा महान उद्देश कार्यात परिणत करण्यास समर्थ करो. नक्षत्र पूर्वक्षितिजावर उदयास आले. कधी उज्ज्वल तर कधी क्षीणप्रभ होत ते सावकाश पश्चिम गगनी गमन करिते झाले आणि हळूहळू अखिल जगताला प्रदक्षिणा घालून, पूर्वी कधीही चमकले नसेल असल्या सहस्रपट अधिक उज्ज्वल स्वरूपात पूर्वेच्या त्याच अरुणप्रांगणी पुनरपि उदयास येत आहे.

स्वाधीनतेची मातृभूमी देवी कोलंबिया, * तुझा जयजयकार असो ! शेजाऱ्यांच्या रक्ताने तू आपले हात कधीही कलंकित केले नाहीस. आपल्या शेजाऱ्यांना लुबाडणे हा स्वतः धनशाली होण्याचा सगळ्यात सोपा मार्ग होय हे तुला कधीच पटले नाही. आणि म्हणून हे तुझेच भाग्य की सर्व सुसंस्कृत राष्ट्रांच्या आघाडीवर शांतीचा ध्वज फडकवीत तू पुढे पुढे जात असावे.

□ □ □

* कोलंबसाने शोधून काढली म्हणून अमेरिकेला कोलंबिया असेही म्हणतात.

# "दरिद्री मूर्तिपूजक"

(२० **सप्टेंबर, दहाव्या दिवसाचे अधिवेशन.**)

ख्रिस्ती लोकांनी नेहमीच सद्हेतूचे स्पष्ट बोलणे ऐकावयास तयार असले पाहिजे. आणि माझी खात्री आहे की मी अमळ टीका केल्यास ती तुम्ही मनास लावून घेणार नाही. ख्रिश्चन बंधूंनो, मूर्तिपूजकांचा आत्मा वाचविण्यासाठी त्यांच्या देशात धर्मप्रचारक पाठविण्याचा हव्यास बाळगणारे तुम्ही, उपासमारीपासून त्यांचा जीव वाचविण्याचा का बरे थोडादेखील प्रयत्न करीत नाही ? भारतात भयंकर दुष्काळ पडून हजारो लोक अन्न अन्न करीत तडफडून मृत्युमुखी पडत असतात. परंतु त्यांच्याकडे लक्ष देण्याची तुम्हा ख्रिश्चन लोकांना काहीच गरज वाटत नाही ! साऱ्या हिंदुस्थानभर चर्च बांधण्यात तुम्ही लोक गुंतले असता, पण तुम्ही सपशेल विसरता की, भारतातील निकडीची गरज धर्म नव्हे. धर्म त्यांच्यापाशी भरपूर आहे. भारतातील दीनदुःखी जनता जर कशासाठी शुष्ककंठाने टाहो फोडीत असेल तर तो अन्नासाठी. अन्नासाठी ते आपल्यासमोर हात पसरीत आहेत आणि आपण त्यांना दगड देत आहोत. क्षुधार्त लोकांना धर्माच्या गोष्टी सांगणे किंवा त्यांना तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचा यत्न करणे म्हणजे त्यांची विटंबनाच करणे होय. भारतात जर कुणी धर्मप्रचारक पैशासाठी धर्माचा प्रचार करील तर तो जातिभ्रष्ट होईल, लोक त्याची छीथू करतील. मी माझ्या अन्नवस्त्रहीन बांधवांकरता तुमच्यापाशी भिक्षा मागण्यासाठी आलो आहे. परंतु ख्रिश्चन लोकांकडून मूर्तिपूजकांसाठी साहाय्य मिळणे किती बिकट आहे, ह्याचा मला पुरेपूर अनुभव येऊन चुकला आहे.

(यानंतर सनातन धर्मातील पुनर्जन्मवादासंबंधी थोडेसे बोलून स्वामीजींनी आपले भाषण संपविले.)

२२ सप्टेंबर, शुक्रवार रोजी, द्वादश दिनाच्या अधिवेशनाप्रसंगी हिंदुधर्माविषयीच अधिक बोलणे झाले त्या दिवशी स्वामी विवेकानंद सनातन धर्मासंबंधी पुष्कळच बोलले. नानामतावालम्बी स्त्रीपुरुषांनी त्यांना अत्यंत उत्सुकतेने धर्मविषयक शेकडो प्रश्न विचारले. स्वामीजींनीही ताबडतोब मोठ्या कुशलतेने त्या



सर्व प्रश्नांना योग्य उत्तरे देऊन श्रोतृमंडळीची जिज्ञासा तृप्त केली. स्वामीजींनी त्या दिवशी सर्वांच्या मनात हिंदूधर्माविषयी इतके कुतूहल उत्पन्न केले की त्या सर्वांनी मिळून स्वामीजींना सनातन धर्मासंबंधी आणखी एक दिवस अन्यत्र भाषण देण्याची सविनय प्रार्थना केली, आणि स्वामीजींनीही त्या आमंत्रणाचा स्वीकार केला.

□ □ □

# बौद्धधर्माचा हिंदुधर्माशी संबंध

**(२६ सप्टेंबर १८९३, सोळाव्या दिवसाचे अधिवेशन)**

माननीय अध्यक्ष आणि बंधूंनो,

आपण सर्वांनी ऐकलेच आहे की मी बौद्ध नाही. आणि तरीही मी बौद्ध आहे असे म्हटल्यासही काही गैर होणार नाही. चीन, जपान व सिलोन त्या जगद्‌गुरू बुद्धदेवांच्या मताचे अनुयायी असतील, पण भारत त्यांची साक्षात ईश्वरावतार मानून पूजा करीत असतो. आपणास आत्ताच सांगण्यात आले आहे की, मी बौद्ध धर्माची समालोचना करण्यासाठी आपल्यासमोर उभा आहे. पण याचा अर्थ मी त्यांचे दोष दाखविणार आहे असा मात्र नाही. ज्यांची मी ईश्वरावतार म्हणून पूजा करतो, त्यांचे दोष दाखविण्याचा माझा हेतू कसा बरे असू शकेल? परंतु बुद्धदेवांसंबंधी आमचे मत हेच आहे की, त्यांचे शिष्य त्यांना नीट समजू शकले नाहीत. ख्रिस्तीधर्माचा यहुदीधर्माशी, जो संबंध आहे, प्रायः तोच आजकाल ज्याला बौद्धधर्म म्हणतात त्याचा हिंदूधर्माशी, म्हणजेच वेदप्रणीत धर्माशी आहे. येशू ख्रिस्त यहुदी होते आणि शाक्यमुनी (बुद्धदेव) हिंदू होते. परंतु फरक एवढाच की, यहुदीलोकांनी येशूंचा त्याग केला, नव्हे, त्यांना क्रूसावर खिळे ठोकून मारले, तर हिंदुलोक शाक्यमुनींना ईश्वराच्या आसनावर बसवून अजूनही त्यांची पूजा करीत आहेत. पण आज प्रचलित असलेल्या बौद्धधर्मात आणि खुद्द बुद्धदेवांच्या उपदेशांत जो एक मुख्य भेद आम्ही दाखवून देऊ इच्छितो तो हा की, शाक्यमुनी कोणत्याही नवीन मताचा प्रचार करण्यासाठी अवतरले नव्हते. येशूंप्रमाणेच तेही पूर्ती करण्यासाठी आले होते, ध्वंस करण्यासाठी नव्हे. फक्त, येशू ख्रिस्तांना जुने यहुदीलोक ओळखू शकले नाहीत, तर बुद्धांच्या खुद्द अनुयायांनाच त्यांच्या उपदेशाचे मर्म कळले नाही. यहुदीलोकांना येशू ख्रिस्तांच्या धर्मात प्राचीन धर्ममतांची (Old Testament-ची) परिपूर्ती दिसू शकली नाही, तर इकडे बुद्धदेवांचा धर्म म्हणजे हिंदुधर्मान्तर्गत सत्यांचीच परिणती होय हे बुद्धांच्या अनुयायांनाच उमजले नाही. मी आपणास पुन्हा सांगतो की बुद्धदेव ध्वंस करण्यासाठी आले नव्हते, ते पूर्ती करण्यासाठी आले होते. आणि म्हणून त्यांचा धर्म म्हणजे हिंदुधर्माचीच स्वाभाविक परिणती, हिंदुधर्माचाच स्वाभाविक विकास होय.



हिंदुधर्माचे दोन भाग आहेत. पहिला कर्मकांड आणि दुसरा ज्ञानकांड, ज्ञानकांडाचे अध्ययन विशेषतः संन्यासीच करीत असतात. ज्ञानकांडात जातिभेद नाही. अति उच्च वर्णांतील व्यक्तींना जसा संन्यास घेण्याचा अधिकार आहे, तसाच अगदी हीन वर्णांतील व्यक्तींनाही आहे. संन्यास घेतल्यानंतर दोघेही समान होऊन जातात. जातिभेद ही केवळ सामाजिक व्यवस्था आहे, खऱ्या धर्मात त्याला स्थान नाही. शाक्यमुनी संन्यासी होते. वेदांमधे जी सारी सत्ये दडलेली होती, ती त्यांच्या उदार हृदयामुळे जगातील सर्वसाधारण लोकांपर्यंत पोहोचू शकली. जगामधे संघटितपणे धर्मप्रचाराचा पायंडा त्यांनीच पाडला. दुसऱ्या धर्मांतील अनेक व्यक्तींना स्वतःच्या धर्मात घेऊन, लोकांना एका धर्मातून दुसऱ्या धर्मात आणण्याचा मार्ग जगाला त्यांनीच प्रथम दाखवून दिला.

सर्वांविषयी, आणि विशेषतः दरिद्री व अज्ञानी लोकांविषयी त्यांचे ठायी वसणाऱ्या लोकोत्तर अनुकंपेतच त्यांची खरी थोरवी आहे. कित्येक ब्राह्मण त्यांचे शिष्य झाले होते. ज्या वेळी बुद्धदेवांनी आपल्या मताचा प्रचार केला त्या वेळी संस्कृत ही दैनंदिन व्यवहारातील भाषा राहिली नव्हती. तिला त्या वेळी फक्त पंडितांच्या ग्रंथांतच स्थान होते. बुद्धदेवांच्या काही ब्राह्मण शिष्यांनी त्यांचे उपदेश संस्कृत भाषेत अनुवादित करण्याची इच्छा प्रकट करताच बुद्धदेवांनी त्यांना स्पष्टच सांगितले की, "मी गरिबांसाठी, सर्वसाधारण जनतेसाठी आहे. त्यांच्या भाषेतच मी त्यांना उपदेश देईन". आणि आजही त्यांचा अधिकांश उपदेश त्या वेळच्या बोलीभाषेतच विद्यमान आहे.

तत्त्वज्ञानाचे स्थान कितीही उच्च आणि त्याची शिकवण काहीही असो, पण जोपर्यंत जगात मृत्यू म्हणून काही राहील, जोपर्यंत मानवहृदयात दुर्बलता म्हणून काही राहील, आणि स्वतःच्या दुर्बलतेच्या जाणिवेने मानवहृदय जोपर्यंत आक्रोश करीत राहील, तोपर्यंत मानवाचा ईश्वरावर विश्वासही राहीलच राहील.

एकीकडे, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्या जगद्‌गुरूंच्या शिष्यांनी वेदाच्या सनातन तत्त्व-मेरूशी धडका घेतल्या, पण व्यर्थ; तो उध्वस्त करणे त्यांना शक्य झाले नाही. आणि दुसरीकडे, प्रत्येक व्यक्ती, मग ती स्त्री असो की पुरुष असो, ज्या ईश्वराचा एवढ्या प्रेमाने आसरा घेत असते, तो सनातन ईश्वर त्यांनी

अवघ्या जातीपासून हिरावून घेतला. ह्याचा परिणाम काय झाला ? हाच की, भारतात बौद्धधर्माला मरण आले, व हे अगदी स्वाभाविकच होते. आणि आज, बौद्धधर्माची जन्मभूमी जो भारत, त्यात स्वतःला बौद्धधर्मीय म्हणविणारा, एकही पुरुष व स्त्री शिल्लक नाही !

परंतु त्याचबरोबर हिंदुधर्माचीही काहीकाही बाबतीत हानी झाली. तत्कालीन भारतासंबंधी लिहिताना एका ग्रीक इतिहासकाराला नमूद करावे लागले होते की, भरतखंडात एकही असत्यवादी हिंदू वा एकही पातिव्रत्यहीन स्त्री आढळली नाही. भारत त्या वेळी इतक्या उन्नत आणि श्रेष्ठ पदास जाऊन पोहोचला होता. हा सर्व बौद्धधर्माचाच प्रभाव होता. आणि त्याच्या ऱ्हासाबरोबरच लोकांत निर्माण झालेला तो सुधारणेचा उत्साह, सर्वांविषयीची ती अपूर्व सहानुभूती व दया, आणि सर्वसाधारण जनतेतील भेदभाव लयास जाऊन तिची झालेली सर्वांगीण उन्नती, या साऱ्यांना हिंदुधर्म अर्थातच मुकला.

इथे, व्यासपीठावर बसलेल्या बौद्धांकडे वळून स्वामीजी बोलू लागले –

हे बौद्ध बंधूंनो, तुमचा त्याग करून आम्ही उन्नत होऊ शकणार नाही. आणि आम्हाला सोडून तुमच्याही उन्नतीची आशा नाही. आपल्यातील विभक्तपणाच्या परिणामांवरून आपण हाच धडा घेतला पाहिजे की, ब्राह्मणांच्या बुद्धीच्या नि तत्त्वज्ञानाच्या साहाय्याखेरीज तुम्ही लोक टिकू शकणार नाही, आणि आम्हीही परत बौद्धांच्या विशाल हृदयाविना जगू शकणार नाही, बौद्ध आणि ब्राह्मण यांच्यातील विभक्तपणाच भारताच्या अवनतीचे कारण होय. याच कारणास्तव भारत आज तीस कोटी भिकाऱ्यांचे निवासस्थान होऊन बसला आहे, आणि ह्यामुळेच आज शतकानुशतके तो परकीय विजेत्यांच्या गुलामगिरीत पिचत आहे. करिता, या, आपण ब्राह्मणांची अपूर्व बुद्धिमत्ता आणि बुद्धदेवांचे विशाल हृदय व त्यांची असाधारण लोककल्याणकारी शक्ती यांचा मिलाफ घडवून आणू या.

□ □. □

# समारोप

**(२७ सप्टेंबर १८९३. शेवटच्या दिवसाचे अधिवेशन)**

सर्वधर्मपरिषद ही आज जगातील एक मूर्तिमंत सत्य घटना होऊन बसली आहे. जे तिला सत्यसृष्टीत उतरविण्यासाठी झटले, त्यांना साहाय्य करून त्या करुणामय प्रभूने त्यांच्या निःस्वार्थ कार्यावर यशाचा कळस चढविला आहे.

ज्या सत्यानुरागी थोर व्यक्तींच्या विशाल हृदयात ही अद्भुत, स्वप्नरम्य कल्पना प्रथम उदय पावली आणि ज्यांनी तिला मूर्त स्वरूप दिले, त्या सर्वांना मी शतशः धन्यवाद देतो. या व्यासपीठावरून ज्यांनी उदार नि सर्वसंमत भावांचा वर्षाव केला आहे त्यांनाही मी धन्यवाद देतो. ह्या ज्ञानसंपन्न श्रोतृसमाजाने माझ्याविषयी सतत सहानुभूती दाखविली आहे आणि ज्या सर्व भावांच्या द्वारा धर्माधर्मातील कलह मिटतील त्या भावांचे सादर स्वागत केले आहे, याबद्दल मी येथील प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार मानतो. ह्या सुसंवादी समन्वयसंगीताचा विरस करणारे काही बेसूर स्वरही क्वचित कानी आले. हे विसंवादी सूर छेडणाऱ्या बंधूंचेही मी विशेष आभार मानतो. कारण, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण विरोधाने त्यांनी येथील एकरसतेस अधिकच माधुर्य आणले, यात संदेह नाही.

सर्वधर्मसमन्वयाच्या सामान्य अधिष्ठानाविषयी येथे यथेच्छ ऊहापोह होऊन गेला आहे. त्यासंबंधी आत्ताच स्वतःचे मत प्रकट करण्याचा माझा मानस नाही. परंतु येथील कुणाला जर अशी आशा वाटत असेल की, या सर्व भिन्नभिन्न धर्मांपैकी एकाचा अभ्युदय आणि इतरांचा विनाश होऊनच उक्त समन्वय प्रस्थापित होऊ शकेल, तर त्याला माझे एवढेच सांगणे आहे की, "बंधो, ही तुझी आशा सफल होणे अगदी अशक्य आहे". ख्रिस्ती लोकांनी हिंदू बनावे अशी का माझी इच्छा आहे ? ईश्वर करो नि तसे कदापि न होवो ! हिंदूंनी वा बौद्धांनी ख्रिश्चन व्हावे अशी का माझी इच्छा आहे ? मुळीच नाही. बीज जमिनीत पेरले जाते. माती, हवा व पाणी त्याच्या भोवती असतात. ते बीज काय माती, हवा किंवा पाणी यांपैकी कुण्या एकात परिणत होत असते ? नाही. या बीजातून रोप उगवते. ते हळूहळू आपल्या स्वाभाविक नियमानुसार

वाढत जाते. आणि माती, हवा व पाणी यांना आत्मसात करून, त्या समस्त उपादानाने स्वतःच्या शाखाप्रशाखांची वाढ करून घेऊन वृक्षात परिणत होत असते.

धर्मासंबंधीही असेच आहे, ख्रिस्ती माणसाला हिंदू वा बौद्ध व्हावयास नको. अथवा हिंदू वा बौद्धालाही ख्रिश्चन बनण्याचे प्रयोजन नाही. तर प्रत्येकाने स्वतःचे वैशिष्ट्य कायम राखूनच इतर धर्मांतील सारभाग ग्रहण केला पाहिजे, आणि तद्द्वारा पुष्ट होऊन स्वतःच्या प्रकृतीनुसार वाढत गेले पाहिजे.

या सर्वधर्मपरिषदेने जर काही जगाच्या निदर्शनास आणले असेल तर ते हेच. तिने अत्यंत सुंदर रीतीने हे सिद्ध करून दाखविले आहे की पावित्र्य, चित्तशुद्धी, दयादाक्षिण्य वगैरे गुणांचा मक्ता जगातील कोणत्याही एका विशिष्ट धर्माने घेतलेला नाही, प्रत्येक धर्मांत अति उदात्त चारित्र्याच्या नरनारींचा जन्म झाला आहे. हा एवढा भरभक्कम पुरावा दृष्टीसमोर असूनही, आपलाच तेवढा धर्म शेवटी जिवंत राहून इतर धर्म नष्ट होतील असे मनोराज्य कुणी रचीत असेल, तर त्या अभाग्याची आपण कीवच केली पाहिजे. त्या बापड्याला मी अगदी स्पष्ट शब्दात बजावून ठेवतो की, त्याच्यासारख्या लोकांनी कितीही अडथळे उभे केले तरी त्या साऱ्यांना तिळमात्र न जुमानता, धर्माधर्मांच्या ध्वजांवर लवकरच लिहिले जाईल – 'संघर्ष नको, परस्परांना साहाय्य करा', 'आत्मसात करा, विनाश करू नका', 'कलह नको – मैत्री हवी, शांती हवी'.

□ □ □

# परिशिष्ट

## एक उद्‌बोधक प्रसंग

आजकाल एक सरावच पडून गेला आहे की, कुणीही उठावे, कुठून तरी कसल्या तरी चार बाजारगप्पा जमा कराव्या, आणि सारासार विचाराच्या भानगडीत न पडता यांच्याच भरभक्कम आधारावर खुशाल एखाद्या धर्माचे वा एखाद्या साऱ्याच्या साऱ्या जातीचे मूल्य ठरवून मोकळे व्हावे! हिंदुधर्माच्या समर्थनार्थ बोलत असता, एके प्रसंगी स्वामीजींनी झणझणीत शब्दांत असल्या फाजील प्रवृत्तीबद्दल श्रोतृवर्गाची छान कानउघाडणी केली. अशा प्रसंगाचे यथायोग्य चित्र मनश्चक्षूसमोर उभे करण्यास उपयुक्त होईल म्हणून नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका ग्रंथातून * खालील उतारा उद्‌धृत करीत आहो –

– 'एरवी ज्याला अत्यंत संकुचित दृष्टिकोण म्हणता येईल अशा मनोवृत्तीचे उत्कृष्ट उदाहरण, एका विख्यात हिंदूने अमेरिकेतील शिकागो शहरी १८९३ साली भरलेल्या सर्वधर्मपरिषदेत विशाल जनसमुदायापुढे व्याख्यान देताना श्रोतृसमाजाच्या नजरेस आणून दिले. व्याख्यान देता देता मधेच थबकून व्याख्याते म्हणाले, 'ह्या श्रोतृसमुदायापैकी ज्यांनी हिंदूंच्या धर्मशास्त्रांचा अभ्यास केला असेल आणि तद्द्वारा ज्यांना त्या धर्माचे प्रत्यक्ष ज्ञान असेल अशांनी कृपा करून एकवार हात वर करावेत'. मोठ्या मुष्किलीने तीन की चार हात वर झाले असतील नसतील आणि, देशदेशान्तराहून आलेल्या प्रमुख धर्मशास्त्र्यांनी तो श्रोतृसमाज ठासून भरलेला होता!

''एकवार त्या श्रोतृवृंदाकडे प्रसन्न दृष्टी फेकून, तो हिंदू क्षणमात्र छाती फुलवून ताठ निस्पंद उभा राहिला आणि अखिल श्रोतृसमाजाच्या अंतःकरणाला प्रत्येक शब्दोच्चारागणिक घरेच पडतील असल्या तीक्ष्ण आवाजात फक्त येवढेच उद्‌गारला – 'आणि तरीही तुम्ही आमचे मूल्य ठरविण्याचे धाडस करताच, अं ?' ''

* * * *

* The Historian's History of the World Vol. II. Page 547.

वाचकांना येथे कळविणे योग्य होईल की, प्रस्तुत पुस्तकात संकलित केलेल्या लहानलहान उपभाषणांखेरीज आणखीही चार उपभाषणे स्वामी विवेकानंदांनी परिषदेच्या शास्त्रीय विभागासमोर दिली होती. पण ती लिहिली न गेल्याकारणे आज आपणास उपलब्ध होऊ शकणार नाहीत. त्यांची वेळ, तारीख व विषय मात्र रेव्हरेंड जे. एच्. बॅरोज साहेबांच्या सर्वधर्मपरिषदेसंबंधीच्या ग्रंथावरून कळू शकतात. (पाहा "जागतिक धर्ममहासभा" – प्रथम खंड, पृष्ठे १५२, १५३ व १५४,) ती सर्व खालीलप्रमाणे होत :–

दिवस व समय :– शुक्रवार, तारीख २२ सप्टेंबर
१८९३, सकाळी १०.३० वाजता.
व्याख्याते :– श्रीमत् स्वामी विवेकानंद.
विषय :– सनातन हिंदूधर्म आणि वेदान्त दर्शन.

* * * *

दिवस :– शनिवार २३ सप्टेंबर
वक्ते :– श्रीमत् संन्यासी स्वामी विवेकानंद व श्रीयुत् एम्. स्नेल.
विषय :– भारतातील अर्वाचीन धर्मपंथ.

* * * *

दिवस :– सप्टेंबर २३. तिसऱ्या प्रहरचे अधिवेशन
वक्ते :– स्वामी विवेकानंद
विषय :– होऊन गेलेल्या भाषणांचे विषय.
वक्ते :– श्रीमत् स्वामी विवेकानंद
विषय :– हिंदुधर्माचे सार.

□ □ □


# आमची काही प्रकाशने

**श्रीरामकृष्णलीलाप्रसंग (तीन भागांत)** – स्वामी सारदानंद
**श्रीरामकृष्णचरित्र** – न. रा. परांजपे
**श्रीरामकृष्ण : संक्षिप्त चरित्र आणि उपदेश** – प्र. ग. सहस्रबुद्धे
**श्रीरामकृष्णवचनामृत (तीन भागांत)** – श्री 'म'
**वर्तमान जग आणि श्रीरामकृष्ण-विवेकानंद** – स्वामी शिवतत्त्वानंद
**आधुनिक भारत आणि श्रीरामकृष्ण-विवेकानंद** – स्वामी शिवतत्त्वानंद
**आमची मुख्य समस्या आणि श्रीरामकृष्ण-विवेकानंद व इतर लेख** – स्वामी शिवतत्त्वानंद
**माझे गुरुदेव** – स्वामी विवेकानंद
**श्रीरामकृष्ण वाक्सुधा** – (पॉकेट साईझ)
**श्रीरामकृष्ण म्हणतात** – (पॉकेट साईझ)

अधिक माहितीसाठी लिहा
**रामकृष्ण मठ**
(प्रकाशन विभाग)
धंतोली, नागपूर-४४० ०१२